शनिवार । २९ मार्च १९८० । ७५ पैसे

माणूस

# आसाम : आक्रमक उपाययोजना का करीत नाही ?

## तीनशेव्या शिवपुण्यतिथीनिमित्त....

आसाम आंदोलनावरील चौथा लेख या अंकात प्रसिद्ध होत आहे. आणखी ३।४ लेख आल्यावर ही मालिका पूर्ण होईल.

तोवर आसामच्या प्रश्नावर काही तोडगा निघेल अशी शक्यता फार कमी आहे.कारण आंदोलन करणारे विद्यार्थी, आंदोलनाला कमीजास्त पाठिंबा देणारे विविध राजकीय पक्ष, केंद्र आणि आसाम राज्य सरकार, हे कुणीच प्रश्नाच्या मुळाशी जायला तयार नाहीत.

विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे अगदी ५१ सालापासून आसाममध्ये घुसून स्थायिक झालेल्या बंगलादेशीय निर्वासितांना बाहेर काढण्याचे सरकारने मान्य केले तरी प्रत्यक्षात ही हकालपट्टी अंमलात येणार कशी ? तीस-तीस वर्षे हे निर्वासित मजूर म्हणून, व्यापारी म्हणून वावरत आलेले आहेत. काहींनी जमिनी घेऊन शेतीवाड्या केल्या, घरेदारे वसवली. अशांची एक संपूर्ण पिढी आसामात जन्मली, वाढली. आसामच्या लोकजीवनाशी, मातीशी हजारो निर्वासितांचे असे रागालोभाचे, स्वार्थाचे. देण्याघेण्याचे नाते प्रस्थापित झाले. ही तीस-तीस वर्षांची नाती एकदम उपटून, तोडून नष्ट करण्याचे ठरवले तरी प्रत्यक्षात हे घडणे अवघड आहे. यासाठी नवे नियम-उपनियम केले, कायदे काढले तरी अनेक पळवाटा हुडकून जो तो आहे तेथेच चिकटून राहण्याचा प्रयत्न करील व आपली नोकरशाही फारच स्वच्छ व कार्यक्षम असल्याने बहुतेकांचे हे प्रयत्न शंभर टक्के यशस्वी ठरतील, अशीच शक्यता जास्त आहे. आपली नोकरशाही जर भ्रष्ट नसती, आपले राजकीय पक्ष जर व्यापक देशहित डोळ्यासमोर ठेवून या निर्वासितांच्या मतांचा मोह टाळू शकले असते तर आज आली आहे ती वेळच का उद्भवली असती ? निर्वासितांना रोखण्यासाठी पुरेसे कायदे अस्तित्वात होतेच. पण त्यांची अंमलबजावणी न करण्यात येथील नोकरशाही, राजकीय पक्ष या सगळ्यांचाच वाटा होता. नवीन कायदेकानू केले, ओळखपत्रे वगैरे दिली तरी हीच नोकरशाही, हेच राजकीय पक्ष उद्याही आसामात राहणार आहेत. तेव्हा नवीन लोंढे येणारच नाहीत, जुने व्यवस्थितपणे हुडकले जाऊन बाहेर कटाक्षाने हाकलले जातीलच याची शाश्वती काय ? जर आसामची नैसर्गिक साधनसामग्री विपुल असेल, तेथे कारखानदारी वगैरे वाढणार असेल आणि राजवट उदार व लोकशाहीवादी असेल तर आसपासच्या कमी विकसित व लष्करी अंमलाखाली दडपल्या गेलेल्या भागातून, म्हणजे मुख्यत: बांगला देशातून, आसामच्या भूमीवर लोकसंख्येचे आक्रमण होतच राहणार, हे उघड आहे. लोकसंख्याशास्त्राचा हा अगदी प्राथमिक धडा आहे. आपण बेफिकीर राहिलो तरी शास्त्र काही बदलत नाही. मद्रासी माणूस मुंबईत येऊन मराठी लोकांवर स्वार होतो. केरळीय माणूस मध्यपूर्वेत जाऊन पैसा-अडका कमावतो. तसेच बांगलादेशीय उद्या विकसित आसाममध्ये येणार नाहीत, त्यांचे आसामी जीवनावर वर्चस्व निर्माण होणार नाही, अशी शाश्वती कुणीच देऊ शकणार नाही. म्हणून या सर्व विभागाचा एकात्म व समतोल विकास हा या प्रश्नावरील खरा, टिकावू उपाय आहे व त्यासाठी ४७ साली या विभागाची, धर्माच्या तत्त्वावर झालेली कृत्रिम फाळणी प्रथम रद्द होणे आवश्यक आहे. बंगलादेशीय रहिवासी घुसताहेत म्हणून त्यांना परत पाठविण्याचा किचकट व उफराटा उप-

दबाव करण्यापेक्षा किंवा असमियांनी अंग चोरून आपल्याच प्रांतात परकीयांच्या दबावाखाली संकोचून जीवन कंठण्यापेक्षा, जिथून बंगलादेशीय निर्वासित येताहेत तो तो भाग, तेवढ्यातेवढ्या प्रमाणात आसाम-बंगालशी जोडून घेण्याची मागणी केली पाहिजे व त्या दृष्टीने आंदोलनेही संघटित करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. गेलेला विकासाचा तोल याशिवाय पूर्णपणे सावरला जाणार नाही व निर्वासितांचा प्रश्नही कायमचा सुटणार नाहीं. प्रत्याक्रमण हा आक्रमण थोपविण्याचा राजमार्ग असतो. हा पुढे जाणारा राजमार्ग, चोखाळण्याऐवजी आसामची नाकेबंदी करण्याची उलट वाट धरली जात आहे हे चूक आहे. किंवा आसामच्या आंदोलनाला संकुचित प्रांतवादी आंदोलन ठरविण्याचा डाव्या व विशेषतः बंगाली पत्रकारांचा दृष्टिकोनही चुकीचाच आहे. बंगलादेशीय नागरिक आसामात घुसतो आहे तर असमियांनी आणि बंगाल्यांनी बंगला देशात घुसण्यास काय हरकत आहे? हा विचारसुद्धा आपल्याला सध्या सुचत नाही. याचे कारण गेल्या हजार वर्षांची आपली गुलामी. सततच्या पराभवामुळे काही मानसिक विकृती निर्माण होतात—चर्चिलने यांना Diseases of Defeat असे म्हटले आहे. गेल्या हजार वर्षात विजयापेक्षा पराभवाचे अनुभव आपल्याला जास्त आले. त्यामुळे आक्रमक उपाययोजनेचा नुसता विचारही आपल्याला भयंकर वाटतो, अशी उपाययोजना वेळीच सुचविणाऱ्या एखाद्या सावरकरालाच आपण वाळीत ढकलून मोकळे होतो. आपण आपापसात दंगली काही कमी करीत नाही. आपण फार मोठे उदारमनस्क, शांतताप्रेमी किंवा अहिंसेचे पालन करणारे आहोत हेही फारसे खरे नाही. बरेचदा आपल्या मारखाऊ आणि पराभूत वृत्तीवर आपण ही नैतिकतेची झूल उगाचच चढवत असतो. ही झूल थोडीफार ओढून काढणारा सावरकरसुद्धा आपल्याला जिथे पचला नाही तेथे शिवाजीचे नावसुद्धा आपण का घ्यावे? शिवाजीला आपण एक तर कुंपणावर तरी बसवून ठेवले आहे किंवा फोटोतून, पुतळ्यातून तो बाहेर पडणार नाही अशी दक्ष सावधानता बाळगली आहे. रायगडाला आपण जाग आणली पण शिवाजीला झोपवले आहे. अलिकडच्या काळात आपले वेद जर्मनांनी नेले. त्यावर संशोधन वगैरे करून अधिक चांगल्या स्वरूपात ते आपल्याला व जगाला पुन्हा उपलब्ध करून दिले. आपली योगविद्या रशियात, अमेरिकेत व इतर विज्ञानात पुढे असणाऱ्या देशात सध्या उचलली जात आहे व लवकरच ती Import ही होऊ लागेल. तसाच आपला खरा शिवाजी देखील माओने, हो चि मिन्हने पळवला होता. तो अद्याप गायबच आहे. आपण फक्त त्याच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करीत आहोत. बंगला देशातून निर्वासित येताहेत? ठीक आहे. मी बंगलादेशच भारताला जोडून घेतो असे खरा शिवाजी म्हणाला असता. त्याने सुरतेची लूट का केली? पैसा नव्हता हे एक कारण खरेच. पण औरंगजेबाच्या मामाने, शाहिस्तेखानाने पुण्यात तळ देऊन स्वराज्याची फार नुकसानी केली होती. ही नुकसानी वसूल करावी म्हणून, त्यावेळी औरंगझेबाच्या ताब्यात असलेल्या सुरतेवर शिवाजी चालून गेला. शत्रूच्या प्रदेशात घुसत नाही तो शिवाजी कसला? इराणमध्ये अमेरिका घुसते आहे म्हणून अफगाणिस्तान आम्ही ताब्यात ठेवणार म्हणणाऱ्या रशियाची आम्ही बाजू घेणार, त्याचे समर्थनही करणार आणि इकडे बंगलादेशीय म्हणजेच पूर्वपाकिस्तानी आपल्या प्रत्यक्ष घरातच वर्षानुवर्षे घुसखोरी करीत आहेत तरी त्यांना नुसते परत जायला सांगण्यातही खळखळ करणार, आपापसातच यासाठी कालमर्यादेवर भांडाभांड करणार! विसंगतीचा, आपल्या अभिजात घोळघालू वृत्तीचा हा कहर झाला. तुलनेने लहान असलेल्या बंगलादेशाच्या बाबतीत आपला हा घोळ आणि पडखाऊपणा


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : चव्वेचाळीसावा
२९ मार्च १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी।
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

दिसतो आहे तर जेथे चीन-अमेरिका या महासत्तांनी शिरकाव केलेला आहे त्या पूर्वांचलाच्या समस्येला आपण कसे व केव्हा भिडणार आहोत ? शिवाजीचे नाव घेणाऱ्यांनी तरी या पडखाऊ वृत्तीवर प्रहार करायला हवेत. मतांवर, निवडणुकीतील यशावर डोळा ठेवून गोडगोड आणि गुळगुळीत बोलण्याच्या वक्तृत्वस्पर्धेत त्यांनीही भाग घेण्याची काही आवश्यकता नाही. ज्यांचे सत्ता हेच सर्वस्व आहे त्यांना गोड बोलणे नि नुसते हसणे याशिवाय पर्यायच नसतो. पण शिवाजीचे फोटो लावून ' परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रं ' म्हणणाऱ्यांनी सेवेला पराक्रमाची, पुरुषार्थाची जोड द्यायला हवी. शिवाजी तिकडे व्हिएटनामच्या जंगलात हरवला आहे, त्याला यासाठी हुडकून इकडे आणावे लागेल. रायगडाला प्रदक्षिणा कसल्या घालता आहात ? गडागडांवरचे पाणी बाटल्यांतून भरून आणून या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त शिवसमाधीवर अभिषेक काय चालवले आहेत ? साम्राज्यवाद्यांविरुद्ध लढून हो चि मिन्हने व्हिएतनाम अखंड केला. आणि आपल्याला आसामचा प्रश्न ही-सुद्धा एक डोकेदुखी ठरावी ! धन्य आहे आपल्या शिवप्रेमाची !

**–श्री. ग. मा.**



## काही ' उत्तर ' शत्रू लोक !

¤ माझ्या एका मित्राला, काही दिवसांपूर्वी नवीन उद्योग सुरू करण्याच्या निमित्ताने पुण्यातील अनेक व्यावसायिकांशी, तसेच सरकारी व निमसरकारी कचेऱ्यांशी संपर्क साधावा लागला. त्या वेळी पत्रव्यवहाराबाबत काही अनुभव आले, त्याची ही हकीकत.

सर्वात खटकली ती गोष्ट म्हणजे सहसा कोणीही आपण पत्र पाठविले तर त्याचे उत्तरच पाठवीत नाहीत. आर. टी. ओ. कचेरी, विमा कंपन्या, अन्न व औषध प्रशासन या सारखी सरकारी खाती तर या बाबतीत अक्षम्य दिरंगाई करतात, पण खाजगी व्यावसायिक, की ज्यांचा आपल्याला उत्तर पाठवण्याने फायदाच होणार आहे तेही या बाबंतीत फारशी फिकीर करीत नाहीत. यात पंखे, रेफ्रिजेटर्स इ. वीजयंत्रे विकणारे, इमारतसामान पुरवणारे असे नानाविध प्रकारचे लोक येतात. काही नमुनेदार संवाद प्रत्यक्ष भेटीअंती झालेले–

* ' अहो मी तुम्हाला १५ दिवसांपूर्वी पत्र पाठविले होते...

' ते तुम्ही होय ? या बसा. मी तुम्हाला उत्तर लिहिणारच होतो...कुठं आहे बरं तुमचं पत्र? ...( ड्रॉवर शोधत) ...( शेवटी कागद पुढे देऊन) असे करा ना, काय पाहिजे होतं ते फ़ेशच लिहून द्या ना ! '

* ' अहो मी तुम्हाला '...इ. इ.

' अहो, इथे रोज पाऊणशे पत्रं येतात. वेळच होत नाही उत्तर पाठवायला ! '

' मग एखादा माणूस नेमा. मी देऊ काय ? '

' छे हो, माणूस परवडतोय काय सध्या! '

* ' अहो मी तुम्हाला ' इ. इ.

' मी इथला नोकर आहे. मालक गावाला गेले आहेत. आणि कुठल्याही कागदावर सही करायचा आम्हाला हुकूम नाही. '

' मग तसं कळवायचं की, सही न करता! '

* (ट्रंक कॉलवरून) ' मी ऑर्डर दिलेला माल आला नाही. मॅनेजर आल्यावर मला फोन करायला सांगा. '

उत्तर : ' आम्ही परगावी फोन करत नसतो ! '

* ' अहो मी तुम्हाला...'

' अहो अशी पुष्कळ पत्रं येतात नुसती चौकशी करणारी. ज्याला खरी जरूर आहे तो येतोच आपसूक ! '

* ' अहो मी तुमच्या ऑफिसला...'

' तुम्ही शहाणे असाल तर पत्र पाठवत जाऊ नका. इथले काम गेल्या वर्षात चौपट वाढलं आहे आणि स्टाफ तेवढाच ! आणखी सहा महिने सुद्धा उत्तर आले नसते ! '

* फोनवर–' मी × × × साहेबांना १५ दिवसांपूर्वी पत्र पाठविले होते.

उत्तर : ' × × × साहेब रजेवर आहेत. '

' त्यांचे जागी कोण आहे ?'

' ते फिरतीवर आहेत ! '

' आपण कोण बोलता आहात ? '

' मी शिपाई आहे. तुम्ही आठ दिवसांनी फोन करा ! '

याला अपवाद दोनच. एका व्यापाऱ्याला माझ्या मित्राला लागणाऱ्या मालाची कुणकुण लागताच त्याचा पत्ता काढत तो रात्री त्याच्याकडे आला. आपल्या मालाचे नमुने दाखवून, गुणवर्णन करून, कन्सेशन्सचे आमिष दाखवून ऑर्डर घेऊनच गेला. तुम्ही एवढा व्याप का केला असे विचारल्यावर म्हणाला, ' व्याप केल्याशिवाय व्यापार होत नाही ! '

दुसरे उदाहरण आहे मुंबईचे. ' इथल्या एका कंपनीत चौकशी करता पत्र टाकताच लगेच उत्तर आले आणि खुद्द त्यांचा माणूस भेटायला येऊन माहिती देऊन गेला.

हे दोन्ही व्यापारी गुजराती होते. त्या पूर्वीच्या उदाहरणातले सर्व जण महाराष्ट्रीय होते. महाराष्ट्र व्यापारात मागे का हा प्रश्न आता तुम्हाला पडायचे कारण नाही !

**–डॉ. शरद अभ्यंकर,**
**वाई**

# मुंबई वार्ता

किरण जोग

## □ शिवसेनेची भूमिका

दि. १९ मार्च सायंकाळी ७ ची वेळ ! ठाणे शहरालाच नव्हे तर मुंबई व आसपासच्या परिसराला भूषण ठरलेल्या ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये तेथील ' रेलसॉटॉ ' चे उद्घाटन करण्यासाठी म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आलेले ! ते येणार हे दोन दिवस अगोदरच कळल्याने मी ' माणूस ' साठी त्यांच्याकडून मुलाखतीला वेळ घेतला. त्यामुळे समारंभानंतर नवीन उद्घटित हॉटेलमध्येच गप्पांना सुरुवात झाली. खूप धांदल असूनही सेनाप्रमुखांनी सर्वच प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.

विधानसभा निवडणुका व शिवसेनेची भूमिका हा प्रमुख प्रश्न होता. पूर्वीइतके नसले तरी अजूनही मुंबईच्या जीवनात 'सेने'चे निवडणुकीच्या संदर्भात दखल घेण्याइतके स्थान आहे.लोकसभा निवडणुकीत श्री.वामनराव महाडीक यांना म्हणजेच शिवसेनेला ९० हजार मते व त्यांचे २१ नगरसेवक हीच गोष्ट स्पष्ट करतात. त्यामुळे इतर पक्षांचा रागरंग जाणून घेताना शिवसेनेची भूमिका काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा माझा प्रयत्न.

सुरुवातीला विषय निघाला तो दसऱ्याच्या शिवसेनेच्या न झालेल्या मेळाव्याचा. बाळासाहेबांचे म्हणणे असे की ते आजारी असतानाही मेळावा व्हावा असे त्यांना वाटत होते; परंतु इतर शिवसेनानेत्यांनी त्यांना असा आग्रह केला की ते (शिवसेनाप्रमुख) असल्याशिवाय मेळावा होणार नाही. त्यामळेच मेळावा रद्द करावा लागला. शिवसेनेचा हा पारंपारिक मेळावा न झाल्याने त्या वेळी झालेली चर्चा ही लक्षणीय होती व शिवसेना हा व्यक्तीचा पक्ष आहे का? असे बोलले जात होते. त्यामुळे ठाकरे यांच्या उत्तराने खुलासा झाला.

' महाराष्ट्रातील खासदारांकडून तुमची अपेक्षा काय ? ' असे विचारल्यावर ते म्हणाले की, ' खासदार हा कोण्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत नसून संपूर्ण राज्याचे प्रश्न त्यांनी मांडणे अगत्याचे आहे असे मला वाटते. त्यामुळे सीमाप्रश्नासारखे महाराष्ट्रातील इतर प्रश्न मराठी खासदारांनी लोकसभेत उपस्थित करावेत अशी सेनेची अपेक्षा आहे. ' एकंदरीत पाहता महाराष्ट्राचे प्रश्न नवीन लोकसभेत येण्यासाठी महाराष्ट्रीय खासदारांनी काम करावे असा ठाकरे यांचा आग्रह दिसला

शिवसेनेने लोकसभा निवडणुकीत वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे आता कोणते धोरण अवलंबणार, की, ' एकला चलो रे ' ची भूमिका घेणार हाही प्रश्न होता. मुलाखतीच्या ओघात बाळासाहेब म्हणाले की, ' एकला चलो रे ' ची भूमिका घेणे अशक्य दिसते. कारण कोणाला कोणाशी तरी समझोता करावा लागणारच !'

निवडणुका जाहीर झाल्यावर लोकशाहीवादी पक्षांची आघाडी हे शब्द वारंवार पुढे येत आहेत. अशा ' लोकशाहीवादी आघाडीत आपला सहभाग असेल काय ? असे विचारल्यावर ' लोकशाहीवादी पक्ष ' यात तुम्ही कॉंग्रेस ( इं ) ला सहभागी करणार नाही का ? ' असा मलाच प्रतिप्रश्न करून ते म्हणाले की, ' कॉंग्रेस (इं) शी ही समझोता करण्यासंबंधी बोलणी करता येतील व शिवसेना निवडणूकसमझोत्याच्या दृष्टीने त्यांना वगळत नाही ' या त्यांच्या बोलण्यावरून वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याची सर्वसामान्यपणे कल्पना यावी.

मुलाखतीच्या वेळी श्री. मनोहर जोशी हेही हजर होते. त्यांच्याशी बोलताना, मध्यंतरी शिवसेना कॉंग्रेस (इं) त विलीन होणार अशी बातमी होती. त्यासंबंधी बोलणे निघाले. आपण दिल्लीला अनेक कॉंग्रेस (इं) नेत्यांशी बोलणी केली हे त्यांनी मान्य केले.ही बोलणी यापुढे करावयाच्या सर्वच क्षेत्रातील युतीसंबंधीच्या संदर्भात प्राथमिक स्वरूपाची होती असेही त्यांनी सांगितले. परंतु त्यांच्यामते ' याचा अर्थ असा नाही की शिवसेना कॉंग्रेस (इं) त विलीन होणार आहे. ' असा काही विलिनीकरणाचा विचार चालू होता याचा त्यांनी साफ इन्कार केला व पत्रकारांनी अवास्तव माहिती दिली असाही आरोप केला. श्री. मनोहर जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे शिवसेना गेली ६ वर्षे कॉंग्रेस (इं) बरोबर आहे व आताही त्यांच्यातून बाहेर जाण्याचा विचार नाही. जोशी यांनी स्पष्टपणे सांगितलेल्या या गोष्टीवरून एक लक्षात येते की येत्या विधानसभा निवडणुकीत हा पक्ष कॉंग्रेस (इं) सोडून इतर पक्षांबरोबर जाईल ही शक्यता तूर्तास तरी दिसत नाही.

" विधानसभा बरखास्तीसंबंधी शिवसेनेची भूमिका काय ? " असाही प्रश्न निघाला. त्यावर श्री. बाळासाहेबांचे म्हणणे असे की, " कोण कमी लोकशाहीवादी व कोण जास्त ? असा विचार करणे मूर्खपणाचे ठरेल. जे जनता सरकारने १९७७ साली केले तेच इंदिराजींनी १९८० साली केले. यांत त्यांना दोष देता येणार नाही. " ते असेही म्हणाले की, प्रा. मधू दंडवतेंनी विधानसभा बरखास्तीचा ' जनता ' निर्णय कसा बरोबर होता व कॉंग्रेस (इं) चा निर्णय कसा चूक आहे, हे जरी कशाही पद्धतीने स्पष्ट करून सांगितले तरी त्यात अर्थ नाही. " ठाकरे यांनी असेही सांगितले की, " जसे करावे तसे भरावे " या न्यायानेच विधानसभा बरखास्तीच्या निर्णयाकडे बघावे लागते. जनता सरकारने १९७७ साली 'त्या' राज्यांना उरलेली ' टर्म ' पुरी करून द्यायलाच हवी होती ' असेही त्यांचे म्हणणे.

' विधानसभा निवडणुकीतील शिवसेनेची भूमिका ठरवताना शिवसैनिकांना विचारात घेतले जाणार नाही. ' हेही त्यांनी स्वच्छपणे सांगितले.पुढे ते असेही म्हणाले की, हा आमच्यात राजकीय निर्णय नेतेमंडळी घेत असतात व ते निर्णय कार्यकर्त्यांच्या हिताचेच असतात. ' त्यामुळे या वेळीही कार्यकर्त्यांचे मनोगत जाऊन हा निर्णय घेतला जाईल असे नाही ', हे त्यांनी स्पष्ट केले; परंतु

'अमुक एक निर्णय का घेतला ?' हे कार्यकर्त्यांना जरूर समजावून सांगितले जाईल', असेही ते म्हणाले.

गप्पांच्या ओघात एक वेगळाच मुद्दा मांडताना शिवसेनाप्रमुखांनी असे सांगितले की, 'झोपडपट्टीला संरक्षण देणारा वटहुकूम व त्या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा या विधानसभा निवडणुकीत विविध राजकीय पक्षांकडून, त्यांच्या फायद्यासाठी, मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेतला जाईल व हा मुद्दा गंभीर असेल.' विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात हा प्रश्न त्यांना महत्त्वाचा वाटतो.

भाववाढीच्या संदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना श्री. ठाकरे यांनी लोकांवरच टीका केली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे 'अमाप पैसे देऊन लोक वस्तू खरेदी करतात त्यामुळे भाववाढीची झळ लोकांना लागली आहे यावर माझा स्वतःचा विश्वास नाही' असे सांगून ते म्हणाले की, 'वस्तूखरेदीवर बहिष्कार टाकून जर लोकच शिवसेनेकडे आले तर त्या संदर्भात विचार करता येईल.'

मनमोकळेपणे झालेली ही मुलाखत चालू असतानाच ठाण्यातील शिवसैनिकसेनाप्रमुखांना बघायला मोठ्या संख्येने बाहेर जमले होते. ¤

# इलस्ट्रेटेड विकलीचे प्रदर्शन

इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडियाने आपली शताब्दी गेल्या आठवड्यात साजरी केली आणि भारतीय जीवनात स्वतःचे असे खास स्थान निर्माण केलेल्या विकलीला अनेक मान्यवरांनी शुभेच्छात बुडवून टाकले. विकलीच्या सामान्य वाचकांना बेनेट कोलमन कंपनीने ताजमध्ये आयोजित केलेल्या शताब्दीसमारंभाला जरी हजर राहता आले नाही तरी या वाचकांना विकलीतर्फेच आयोजित करण्यात आलेल्या कुमारस्वामी हॉलमधील प्रदर्शनाला अवश्य भेट देता आली.

१८८० ते १९८० या काळातील भारतीय इतिहासाचे प्रदर्शन आहे की, 'विकली'मध्ये आलेल्या उत्कृष्ट फोटोंचे प्रदर्शन आहे, असा प्रश्न पडावा इतपत या प्रदर्शनाने गेल्या शंभर वर्षातील इतिहासाचे दर्शन घडवले. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या युवापिढीला या प्रदर्शनाचे नाविन्य वाटावे हे स्वाभाविकच; परंतु त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेल्या अनेकांनीही हे गेल्या शंभर वर्षांचा इतिहास दाखविणारे प्रदर्शन मोठ्या अगत्याने पाहिले, यात त्या प्रदर्शनाचे यश दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेल्यांनी काही प्रमाणात का होईना; परंतु ब्रिटिश काळ बघितला आहे व म्हणूनच त्या काळातीलच जास्तीतजास्त चित्रे असलेले हे प्रदर्शन त्यांना आवडावे ही प्रदर्शनाच्या सफलतेची पावतीच म्हटली पाहिजे.

प्रदर्शनाच्या सुरुवातीस विविधरंगी फुलपाखरांची चित्रे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत घेत होती. फुलपाखरांचे प्रकार तरी किती असणार ? हे असंख्य प्रकार रसिक वाचकांचे लक्ष आकर्षित करत नसते तरच नवल. 'कॉमन झेबल'पासून ते 'ब्लू पॅन्सी'पर्यंत हे फुलपाखरांचे अनंत प्रकार सर्वांनाच आकर्षक वाटले. त्याच्यानंतर श्री. बाळकृष्ण यांच्या कॅमेऱ्यातून 'सजीव' झालेली नौदलाची चित्रे होती. नौसैनिकांच्या चेहऱ्यावरची जिवंत झालेली रेष न रेष फोटोग्राफरचे कौशल्य जसे चित्रित करीत होती तशीच 'फोटो'चे सामर्थ्यही त्यातून दिसत होते.

'इलस्ट्रेटेड विकली'च्या सुरुवातीला 'विकली' टाइम्स ऑफ इंडिआचा विकली म्हणूनच निघत होता. त्या काळातील आठवणींचे ओलावे या प्रदर्शनात न दिसते तरच नवल. दि. १७ जानेवारी १८८० (शनिवार) रोजी 'टाइम्स ऑफ इंडिआ विकली'चे मोठमोठे फोटो व त्यातील घटनांचे दर्शन असलेला मजकूर हे निश्चितच नावीन्यपूर्ण होते 'इतिहासाची पुनरावृत्ती होत असते' हे निश्चित ! कारण १८८० साली ज्याप्रमाणे अफगाणिस्तान संघर्षाच्या कक्षेत होते त्याचप्रमाणे आज १९८० सालीही आहे. त्यामुळे त्या वेळच्या 'टाइम्स ऑफ इंडिआ विकली'त प्रसिद्ध झालेला अफगाणयुद्धावरचा चित्रित केलेला मजकूर पाहताना घटनांच्या पुनरावृत्तीचे चित्र सहजच लक्षात येते.

यंदाच्या नोबल प्राईझविजेत्या श्रीमती मदर टेरेसा यांचे फोटोही सुरेख आहेत. दयाळू व ममताळू अशा या समाजसेविकेच्या चेहऱ्यातूनही तिच्या मनीच्या भावना निश्चितच प्रतीत होत आहेत. ऑक्टोबर १९७८ ला 'विकलीने' जगातील 'तेलप्रश्नावर' खास अंक काढला होता. अनेक हात मागत असलेले तेल व संपणारे तेलाचे साठे याचे चित्रण या अंकातील फोटोत होते. हॉलमधील कमालीच्या शांततेनं हे प्रदर्शन बघताना एक मात्र जाणवत होते की, या हॉलमध्ये आकर्षकपणे प्रदर्शनाची मांडणी करण्यात आलेली नव्हती. चोहोकडे चित्रे मांडण्यात आली होती; परंतु इतर सजावट 'विकलीच्या' दर्जाला शोभेशी नव्हती. 'लाइफ आफ्टर डेथ' (मरणानंतरचे जीवन) या विषयावर 'विकली'ने काढलेल्या अंकातील काही रहस्यमय तर काहीशी अनाकलनीय वाटणारी चित्रेही यात होती. भारताच्या ऐतिहासिक गोष्टींची नोंद घेणारी अकबराची चित्रेही प्रदर्शनात दिसत होती. त्याचप्रमाणे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवीन कलाटणी देणाऱ्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळचे महात्मा गांधींचे फोटोही स्वातंत्र्ययुद्धाची 'याद' करून देत होते.

'टाइम्स ऑफ इंडिया' गटात सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. आर. के. लक्ष्मण यांचे स्वतःचे असे खास स्थान आहे. त्यांनी रंगवलेले विकलीचे मुखपृष्ठही या फोटोच्या प्रदर्शनात दिमाखाने झळकत होते. हे व्यंगचित्र होते 'आर वी वेस्टिंग पब्लिक मनी?' असे शीर्षक असलेल्या लेखासाठी काढलेले. 'अेअर अिंडिया'वर विकलीचे माजी संपादक श्री. खुशवंतसिंग यांनी तयार केलेल्या स्टोरीवरील फोटोही लक्ष वेधून घेत होते.

१८७४ च्या वेळेस, सध्या गजबजलेल्या रस्त्यावरचे, पायधुणीच्या भागातील काढलेला एक फोटोही तेव्हाची ट्रॅमची मुंबई स्पष्ट करीत होता. ज्याप्रमाणे या प्रदर्शनात शांततेच्या काळातील विलोभनीय चित्रे दिसतात, त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुद्धातील हिरोशिमावर टाकलेल्या अणुबाँबचा फोटोही या अस्त्रांचा संहारकपणा स्पष्ट करीत होता. याच प्रदर्शनात ब्रिटिश काळातील हायकोर्टआवारातील फोटोही त्या वेळचे चित्र स्पष्ट करीत होते.

फोटो पहातानाच दुसरे महायुद्ध सुरू करणाऱ्या हिटलरचे फोटो जसे दिसले तसेच पंडित नेहरू या शांततेच्या उद्गात्याचेही.

पंडित नेहरू व मार्शल टिटो यांचे फोटोही यात दिसत होते. 'इलस्ट्रेटेड विकलीने' जे क्रिकेटविशेषांक काढले त्या अंकाचेही स्मरण त्यातील फोटोंवरून होत होते. सुनील गावस्कर यांचा एक सुरेख फोटोही त्यात दिसत होता.

जयप्रकाश नारायण यांचा १९७७ च्या निवडणुकीतील मुंबईच्या प्रचंड सभेचा फोटोही यात दिसत होता; परंतु विविध विषयांवरचे फोटो बघताना एक गोष्ट मात्र निश्चितच जाणवली. ती म्हणजे सर्व फोटोंवर ब्रिटिश काळातील छाप व त्या वेळचे वातावरण दिसत होते. १८८० ते १९४७ या मोठ्या काळातील फोटो दिसत असताना जरी हे होणे स्वाभाविक असले तरी एक प्रकारची सुसंगती यात दिसत नव्हती व भारतीय सांस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले नाही असे प्रेक्षकांना जरूर वाटत होते. अर्थात 'टाइम्स ग्रुप'चा स्वभाव पाहिल्यास यात अनपेक्षित वाटू नये.

वल्लभभाई पटेल व गांधींचे फोटो चटकन लक्ष वेधून घेत होते. आणखीन एक गोष्ट जाणवत होती ती म्हणजे क्रीडाक्षेत्रातील बहुसंख्य फोटोंची जागा क्रिकेटच्या फोटोंनीच व्यापली होती. इतर राष्ट्रीय लोकांना किंवा इतर आंतरराष्ट्रीय लोकांना फारच कमी स्थान दिले होते. जो खेळ केवळ ७ देश खेळतात व ज्यात पाण्यासारखा पैसा खर्च होतो व तसेच ज्यास ऑलंपिकमध्ये स्थान नाही, अशा खेळाचा उदोउदो एका नशेपायी लोकांनी केला तर निदान समजू तरी शकते; परंतु 'विकली'-सारख्या नेणत्या-जाणत्या साप्ताहिकाने अशीच गोष्ट करावी हे खटकणारे होते. ☐

## ☐ ग्रामीण जीवनाचे दर्शन

क्रॉस मैदानावर मध्या चालू असलेले खादी ग्रामोद्योग कमिशनचे प्रदर्शन म्हणजे ग्रामीण भागाचे जिवंत दर्शनच आहे. खादी ग्रामोद्योग कमिशनने २५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल हा प्रदर्शनाचा खटाटोप केला आहे व लोकांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. प्रदर्शनातील आत जाण्याचा रस्ताच मुळी एका झोपडीतून जातो व तेथपासूनच ग्रामीण जीवनाचे दर्शन व्हायला प्रारंभ होतो.

गिरण्यांची धुराडी व प्रचंड औद्योगीकरण यांच्यातच बुडून गेलेल्या मुंबईकरांना तर हे प्रदर्शन म्हणजे एक पर्वणीच आहे. ५० पैसे इतक्या माफक दरात पाहता येणाऱ्या या खादी ग्रामोद्योगाच्या प्रदर्शनात विविध उपक्रमांची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. केवळ लोकांना ग्रामीण उपक्रम समजावेत असाच आग्रह नाही आहे तर प्रात्यक्षिकांसह ते लोकांपर्यंत पोहचावेत ही प्रदर्शन आयोजित करणाऱ्यांची दृष्टी आहे व त्याला यश मिळत आहे.

या प्रदर्शनात विशेष भर दिला आहे तो वस्त्रोद्योगावर. वस्त्रोद्योगातील विविध टप्प्यांचे दर्शन होत जाते. कापूस पिंजणे, त्याचा पेळू बनविणे या गोष्टींची माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'चरख्यावर दोरा बनविणे' या प्रकाराचीही सविस्तर माहिती येथे दिसते. याच वस्त्रोद्योगात प्रेक्षकांना हातमाग व यंत्रमाग यांचे दर्शनच घडविण्यात आले आहे. वस्त्रे रंगविणे व त्यावर नक्षीकाम करणे या पारंपारिक भारतीय गोष्टींचे दर्शनही येथे होत जाते.

केवळ यंत्रे दिसणे हाच उद्देश नसून जिज्ञासूंना कळण्यासाठी विविध यंत्रांवर त्यांची किंमत व रोजची उत्पादनक्षमता यांची माहितीही लावण्यात आलेली दुरूनही दिसू शकते. यात आणखीन एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे 'पॉलीवस्त्राचे' दर्शन. पॉलीस्टार व खादी यांच्या मिश्रणातून पॉलीवस्त्र या कापडप्रकाराची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच अत्यंत वेधकरीत्या तुतीच्या झाडांवरील किडयांच्या जीवनातील सर्व अवस्थांचेही आपल्याला दर्शन होते.

ग्रामोद्योगाच्या या प्रदर्शनात कोशापासून रेशमी धागा व त्यापासून तलम रेशीमही आपल्याला बनताना दिसते. केवळ वस्त्रोद्योगाचेच दर्शन होते असे नाही तर आगपेट्या, उदबत्त्या या व अशा प्रकारच्या गोष्टीही प्रदर्शनात पाहावयास सापडतात. कुंभारांनी तयार केलेल्या वस्तू व वाखाच्या वस्तूंचे दर्शनही या प्रदर्शनात नीटपणे होते.

मधुमक्षिकाकेंद्राचीही प्रदर्शनात सविस्तर माहिती देण्यात आली आहे. हा व्यवसाय कसा केला जातो याची केवळ वरवरची माहिती नाही तर बारकाव्यांसह तो व्यवसाय व त्यातील प्रमुख गोष्टी यांचा चित्रपटच आपल्या डोळ्यांसमोरून सरकत जातो. इतकेच नव्हे तर प्रदर्शनाच्या बाहेरच्या आवारात प्रत्यक्ष मधुमक्षिकापालनाचे खोकेही ठेवण्यात आलेले दिसतात.

या प्रदर्शात इतके स्टॉल आहेत की, अक्षरशः काय पाहू व काय नको अशी अवस्था होते. या ठिकाणी जसा गोबरगॅसप्लँट आहे तसेच कागदांची निर्मिती व तेलाची घाणी व तेलव्यवसाय यांचेही स्टॉल

पृष्ठ २४ वर

मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

**टॉलस्टॉय – एक माणूस**

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# बालवाड्या आणि बालवाड्या

वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत मी कसा होतो, काय करीत होतो याची मला आठवण नाही. एका प्रसिद्ध व्यक्तीच्या आत्मचरित्रात 'मुंजीपूर्वीचे आम्ही' असा फोटो आहे. त्या काळी मुंजी पाचव्या वर्षी होत; पण आमच्याकडे मोठ्यांचेच फोटो काढण्याची सोय नव्हती तर लहानपणचे फोटो कुठून काढणार? लहानपणी कसे दिसत होतो हे ठाऊक नाही किंवा पाच वर्षांच्या आधीच्या वयात काही आठवावे तर ते आठवत नाही, अशी आमची स्थिती.

एक नक्की आठवते की आमच्या लहानपणी बालवाड्या नव्हत्या. मग आम्ही वाढलो कसे? हा प्रश्न आलाच. मुख्य म्हणजे आम्ही वेळ कसा घालविला? आयुष्य म्हणजे वेळ घालविण्याचा प्रश्न. आयुष्याच्या मी केलेल्या काही व्याख्यांपैकी ही एक. वेळ घालविण्याचा हा प्रश्न लहानपणी सर्वांत कठिण असतो. 'आई! मी काय करू? चैन पडत नाही,' असे प्रत्येकजण आईच्या मागे वारंवार टुमणे लावतो ते उगीच का? बालपणी सर्वांत वेळ मंद जातो. तरुणपणी वेळ जाण्यात जरा वेग येतो आणि म्हातारपणी, वाटोळा दगडी गोळा उतारास लागावा तसा वेळ पळत असतो.

बालपणी आमचा वेळ धुळीत खेळण्यात, शेळ्या, मेंढ्या यांच्यामागे धावून त्यांचे दूध काढण्यात, मोठ्या मुलांच्या मागे जाण्याचा हट्ट धरून आंबे, जांभळे, चिंचा यांच्यावर दगड मारण्याचा यत्न करण्यात, म्हशीमागे पाण्याला जाण्यात, वाळवणे घालण्यास आईला मदत करण्यात, खापऱ्या खेळण्यात आणि आईने सक्तीने म्हणावयास सांगितलेले संध्याकाळचे श्लोक, स्तोत्रे वगैरे म्हणण्यात जात असे. इतर मुलांबरोबर आम्ही कुठे खेळत असू याचा आम्हालाच पत्ता नसायचा. खेळता खेळता तीन-चार वेळा भूक लागलेली लक्षात यावयाची आणि तितक्याच वेळा वेळ जात नाही हे लक्षात यावयाचे. तेवढ्यापुरते आम्ही घरात येत असू.

शहरांमध्ये अंगणे उरली नाहीत, रानात जाणे शक्य नाही, गाई-म्हशी-शेळ्या नाहीत, आंबे, करवंदे-जांभळे पाडायला जाता येत नाही. घरात नियमनामुळे मुलांची संख्या एक किंवा दोन आणि ब्लॉक पद्धतीने शेजार उरला नाही. यामुळे पाच वर्षापर्यंतच्या मुलांचा मोठा प्रश्न येऊन पडला आहे. त्यासाठी वडीलमाणसांनी मुलांशी खेळायची पद्धत सुरू झाली; पण तीही गैरसोयीची होती. मग वडील माणसांना थोडा विसावा मिळावा म्हणून मॉंटेसरी शाळा किंवा बालवाड्या सुरू झाल्या.

बालवाडी निघण्याची व बालवाड्यांच्या उपयोगाची ही उथळ वरवरची कारणे मी दिली. बालमानसशास्त्रदृष्ट्या बालवाड्यांचा अतिशय उपयोग आहे; पण माझा तो अभ्यास नसल्याने अभ्यासू लोकांकडून त्याची माहिती घ्यावी. शहरात बालवाड्यांचा उपयोग सर्वांना पटला आहे व बालवाड्या कमी पडत आहेत, त्याचे रूपांतर मोठ्या शहरांतील मॉंटेसरीच्या वाढलेल्या फीत होत आहे. मी असे ऐकतो की मॉंटेसरी शाळांतील शिक्षणाचा खर्च काही शाळांतून कॉलेज-एवढा आहे.

¤

हे काही असले तरी बालशिक्षणाचे महत्त्व कमी होत नाही. फियांचा प्रश्न अलाहिदा. या बालवाड्यांचा उपयोग शहरापेक्षा लहान गावांतून जास्त आहे. त्याबद्दल बोलताना सौ. निर्मलाबाई पुरंदरे म्हणाल्या, 'तालुका-गावांसारख्या लहान गावांतून एस. एस. सी. चे निकाल कमी लागतात त्याचे कारण मुलांना लागावी तेवढी शिक्षणाची गोडी लागलेली नसते. शाळांतून विद्यार्थ्यांची गळती फार मोठ्या प्रमाणात आढळते. मुलांना शिक्षणाची गोडी लागण्यास तीन ते सहा हे वय उत्तम असते; पण लहान गावांतून या वयांतील शिक्षणाची (बालवाड्यांची) सोय नसल्याने तीन ते सहा या वर्षांची मुलं तो काळ शेळ्या-मेंढ्यांमागे जाणं, रानात हिंडणं, शेतावर जाणं, आई-वडिलांना मदत करणं आणि मुख्य म्हणजे खेळ वगैरेत घालवितात. मुलामुलींना ते योग्य असले तरी त्यातील थोडा वेळसुद्धा शिक्षणाला दिला जात नाही. मग मुलगा-मुलगी जेव्हा एकदम प्राथमिक शाळेत जातात तेव्हा त्यांना जड जाते. पुष्कळांना अभ्यासाची गोडीच लागत नाही. तसे होऊ नये म्हणून हा बालवाड्यांचा उपक्रम आम्ही सुरू केला.

¤

सौ. निर्मलाबाई मु. पो. शिरूर (घोडनदी) येथे 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट'तर्फे बोलत होत्या. इन्व्हेस्टमेंट इन मॅन ही पुण्यात स्थापन झालेली संस्था. फुलगाव येथे ट्रस्टतर्फे शेतीविकासाचे कार्य चारपाच वर्षांपूर्वी सुरू झाले आहे व बालशिक्षणालाही ट्रस्टने या भागात खूप चालना दिलेली आहे. यासाठी आसपासच्या लहान गावांतून बाल-

वाड्यांचे उपक्रमही ट्रस्टने हाती घेतले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून शिरूर येथे या ट्रस्टतर्फे गेले वर्षभर बालवाडी चालविण्यास शिक्षिका तयार करण्याचे वर्ग घेतले गेले. या भावी बालवाडीशिक्षिका तयार करण्याच्या कामात हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेचे सहकार्यही या ट्रस्टला लाभले आहे. हा एक वर्षभराचा उपक्रम होता. ते वर्ष संपून उपक्रम पुरा झाल्याबद्दल हा काहीसा निरोपसमारंभ होता. शिरूरच्या नगरपालिकेच्या इमारतीतील प्रचंड हॉलमधे हा समारंभ घेतला होता. इमारतीत शिरताच आतल्या चौकात प्रवेशद्वाराशी मुलींनी रांगोळ्या घातल्या होत्या. सनईची रेकॉर्ड लागलेली होती. आत गावातील स्त्रीपुरुष व मुले यांनी पाऊण सभागृह भरले होते. लहान गावातून समारंभाचा उत्साह खूप असतो तसा उत्साह होता, गोंगाट, हाका, ओरडा याने सभागृह दणदणले होते. लहान गावात कुठलाही समारंभ असो त्यात या ना त्या तऱ्हेने गावातील प्रत्येकजण गुंफला जातो. परत्व कमी असते. आत जाऊन समोरच्या भिंतीशी घातलेल्या भारतीय लोड–तक्क्यांच्या बैठकीवर आम्ही बसलो.

सौ. निर्मलाबाई पुरंदरे यांनी जिल्हा परिषदेचे प्रमुख अधिकारी श्री. सगणे यांचा परिचय करून दिला. या समारंभाचे ते प्रमुख पाहुणे होते. ग्रामीण भागात त्यांचे शिक्षण झाले असून ते पुढे आय. ए. एस. झाले. शेतकऱ्यांतूनच ते वाढले. त्यांना ग्रामीण जीवनाची पूर्ण कल्पना आहे. सौ. निर्मलाबाई पुढे म्हणाल्या, 'मुलांची आवड आहे या एका गुणावर आठवी–नववी झालेल्या मुलींना आम्ही बालवाड्यांचे शिक्षण दिले. या मुली–मुलांची आवड असल्यानं उत्तम शिकवितात. त्यांना सहा महिन्यांचा कोर्स देऊन आम्ही तालुका पंचायत व जिल्हा बोर्डाच्या स्वाधीन करतो. एका तालुक्यापुरते आम्ही हे कार्य हाती घेतले. एक बॅच तयार होऊन गेली. आता ही दुसरी बॅच. या बॅचला ४३ मुली आल्या. खुद्द शिरूरच्या व तालुक्यातील इतर गावांतून १८ व बाहेरच्या तालुक्यांतील ८ मुली होत्या. सर्वांची आर्थिक परिस्थिती निकृष्ट होती. कुंभार, हमाल, शेतकरी असे या मुलींचे पालक होते. ४३ मुलींपैकी २१ मुलींना सायकलवर बसता येत होतं. त्याचा उपयोग होईलच.'

एक बालवाडी सुरू करायला काय काय लागतं हे त्यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या, "एका बालवाडीस, जरा मोकळी जागा, एक शिक्षिका, एक मदतनीस बाई, शिक्षिकेची राहण्याची सोय, एक फळा, पाणी पिण्याची सोय. शिक्षिकेला १००–१२५ रुपये पगार मिळावा अशी अपेक्षा आहे. मदतनीस स्त्रीस २५ रु. शिकवण्याच्या साहित्यास २०० रु. बालवाडीचा वर्षाचा साधारण खर्च २५०० ते ३००० रुपये येतो.

"बालवाडीत फार मोठी बीजं आहेत. ट्रस्टने यापूर्वी सतत केलेल्या बालवाड्यांच्या साखळीतूनच २००० मुलांना ए व्हिटॅमिन दिले गेले. बालवाडी–शिक्षिका ही खेड्यातील घराघरात पोहोचण्यास उपयोगी पडेल. बालवाडीमुळे बालवयात मुलांना शिक्षणाची गोडी लागेल हे वेगळेच. आमच्या योजनेत शिरूर नगरपालिकेने आम्हाला सर्वतोपरी सहाय्य दिले."

¤

शिरूरला जाण्यासाठी आम्ही रविवारी ( दि. ९ मार्च ) पुण्याहून खास एस. टी. ने निघालो. काय कुणास ठाऊक; पण आतापर्यंत शिरूरला माझे हे तिसऱ्या–चौथ्यांदा जाणे घडत होते. एकदा नगरला जाताना मी उतरलो होतो. येथील स्टँडवरची भजी प्रसिद्ध आहेत हे मी दुसऱ्यांदा शिरूरला गेलो तेव्हा कळले. जिल्हा परिषदेतर्फे होणाऱ्या नाटयस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून आम्ही गेलो होतो. स्पर्धा संपल्यावर रात्री खूप उशिरा जेवणे झाली. तेव्हा स्टँडवरून परीक्षकांपैकी एकाच्या सांगण्यावरून स्टँडवरून भजी मागविली.

आता शिरूरला मी तिसऱ्यांदा चाललो होतो. इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्टचे पदाधिकारी बरोबर होते. त्यात अच्युतराव आपटे, सेठ पतीपल्ली, मॅथ्यू लेदरले, सौ. निर्मलाबाई वगैरे कार्यकर्ते होते. तसेच हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या श्री. शांताबाई आठवले होत्या. त्यानीच शिरूर येथील मुलींना शिक्षण दिले. शिरूर येथील समारंभात त्याही बोलल्या. त्या म्हणाल्या, "हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या आम्ही शिक्षिका येथे वर्षभर शिकविण्यास येत होतो. शहरामधील अनुभव आमच्या गाठी होता. कोसवाडला आम्ही आदिवासींना शिकविले; पण शहर व आदिवासी यांपेक्षा लहान गावातून काय वेगळा अनुभव असतो हे कळले. इथे येऊन शिकविण्याची संधी मिळाल्यामुळे शिकवण्यात काय फेरफार करायला हवा हे कळले. इथे फार निराळा अनुभव आला. त्यामुळेच पुस्तक लिहिता आले. नववी पास झालेल्या व गावात घरी बसून असलेल्या मुलींना काही काम नव्हते. इथे त्या जीव ओतून शिकल्या. तसेच शिरूरच्या लोकांनी जे अगत्य दाखविले तेही विलक्षण. बालवाडीच्या प्रत्येक पालकाने आमच्या अडचणी दूर करण्यास सहाय्य दिले. मुलींना तर वाटे आम्ही त्यांच्यावर जणू उपकारच करीत आहोत."

शांताबाई आठवले यांच्याआधी वैद्य नावाच्या शिक्षिकेने सांगितले की, 'बालवाडी म्हणजे माझी कल्पना की, डबे खावयाचे व घरी जावयाचे. बालमानसशास्त्र का शिकवितात हे मला नंतर कळले. बालकात या शिक्षणाने कसा फरक पडत जातो हेही पाहिले. टाकाऊ वस्तूंपासूनही मुलांना शिकविता येते. केर काढणे, भांडी घासणे हीं कामे सर्वांनी केली पाहिजेत अशी आहेत. त्यामुळे कामाची शिस्त लागते.'

समारंभास 'करू स्वागत प्रेमे अजि अपुले', या स्वागतपदाने सुरुवात होऊन, मग मुलांचे नाटयप्रयोग झाले. त्यात– 'माकडाचा खेळ आता सुरू हो झाला'– हे गीत साभिनय गायिले. मुलांचा उत्साह अपूर्व होता. तसाच प्रेक्षकांचाही. लग्नसमारंभासारखा तो देखावा होता. नवरानवरीकडे म्हटले तर सर्वांचे लक्ष असते म्हटले तर नसते. तसेच प्रेक्षकांचे लक्ष मुलांच्या खेळाकडे होते; पण ज्या खेळीमेळीने हा समारंभ चालला होता त्यावरून ट्रस्टच्या लोकांवरचे इथल्या मुलींचे प्रेम कळत होते.

नंतर सभापतींचे भाषण झाले. ते म्हणाले, "इन्व्हेस्टमेंट इन मॅन या ट्रस्टतर्फे गेले वर्षभर येथील मुलींना बालवाडीचे शिक्षण मिळाले त्याबद्दल धन्यवाद. हा दुष्काळी जिल्हा; पण आम्हाला या मंडळींनी चालना दिली. पंचायतसमितीने ठरविले की, या लोकांना साथ दिली पाहिजे. तालुक्यातील ७५ मुलींना शिक्षण देऊन गाव तिथे बाल-

वाडी असे झाले पाहिजे. पंचायतसमितीचा हा निश्चय आहे. शिरूरमधील बालवाडी शिकलेल्या जास्त मुली खेडयात जाऊ शकत नाहीत. आम्ही सुचविले-शिरूरबाहेरच्या मुली घ्या, त्यांनी घेतल्या. पंधरा बालवाडयांना आम्ही १५००० रुपयांची तरतूद केली आहे. शिवाय ४०।५० बालवाडयांना आमचे सहकार्य आहे."

जिल्हा परिषदांचे प्रमुख अधिकारी श्री. सगणे म्हणाले, 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' ट्रस्टचे मी त्यांच्या येथील कार्याबद्दल आभार मानतो. ग्रामीण भागातील मुलं स्वकर्तृत्वानं पास होत असतात. त्यांचं पास होण्याचं प्रमाण कमी दिसलं तरी त्यांना उपलब्ध परिस्थितीत हे प्रमाण चांगले आहे. पुढील वयातील अभ्यासाच्या तयारीस ग्रामीण मुलांना बालवाडयांचा नक्की उपयोग होईल. इथे बालवाडया फीशिवाय आहेत. ग्रामसंस्थांनी आपापली बालवाडी चालविली पाहिजे. आम्ही सर्व ग्रामपंचायतींना बालवाडी काढण्याचा आग्रह करणार आहोत."

यानंतर अध्यक्षांच्या भाषणाने समारंभाचा समारोप झाला. मॅथ्यू लेदरले यांनी ट्रस्टतर्फे आभार मानले. शिरूर नगरपालिका-अध्यक्ष रसिकलाल धारिवाल म्हणाले, "प्रथम जेव्हा सौ. निर्मलाताई व सौ. सेठ माझ्याकडे आल्या तेव्हा मला वाटले ही शहरातील माणसं काही तरी योजना घेऊन आली असतील. अशी माणसं नेहमी येतात. त्यांना चहा पाजून निरोप देऊ; पण ते जमले नाही. २६ जानेवारीला २ बालवाडया सुरू झाल्या. प्राथमिक तयारी काही नव्हती, ट्रस्टने सामान आणले. कुंभारआळी हा इथला मागासलेला भाग. त्या एरियातील मंडळींनी मुलं गोळा केली. नगरपालिकेने आठशे रु. भाडे येत असता बालवाडीला विनामूल्य जागा दिली. ट्रस्ट आता इथून जाऊ म्हणत आहे. त्यांनी जाऊ नये. पुढचे वर्गही इथे अॅरेंज करावेत. आम्ही संपूर्ण सहकार्य देऊ."

◻

पुण्याच्या काही लोकांनी बाहेर जाऊन कार्य करावे, ही कौतुकाची गोष्ट होती. ती आम्हाला पहावयास मिळाली. शहरातले लोक लहान-गावातील लोकांना कार्य करण्यासाठी यायला हवे असतात हे येथील उत्साहावरून कळले. या संस्थेचे जड नावसुद्धा ते प्रयत्नाने उच्चारीत होते. मला मात्र वाटले की, 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' असले अगडबंब नाव खेडयात काम करण्यास जाणाऱ्या संस्थेला सोयीचे नाही. आता खेडयातील लोकांना इंग्रजी शब्द वापरावयाची हौस असते हे खरे; पण ते शब्द साधे साधे असतात,-आयडिया, अॅरेंज, प्लॅन वगैरेसारखे. 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' हा शब्द त्यांना फारच होतो तेवढा ट्रस्टने विचार करावा.

तसेच खेडयात बालशिक्षणाबद्दल पटविताना थोडा आपला जुना संदर्भ द्यावा. माझ्या मते सुमंत प्रधान हा पहिला मॉंटेसरी शिक्षक होय. हा दशरथ नावाच्या राजाचा प्रधान होता. दशरथाला राम नावाचा पुत्र झाला. बालपणी रामाने चंद्राचा हट्ट घेतला. तेव्हा या सुमंत प्रधानाने आरशातून चंद्र जवळ आणून त्याला समजाविले. हा सुमंताने वापरलेला आरसा मॉंटेसरीचे पहिले साधन होय. त्यानंतर श्रीकृष्णाच्या बाललीलांत मॉंटेसरीच्या खुणा सापडतात. किंबहुना मी म्हणेन की आपल्याकडे मुलांचे जेवढे कौतुक, त्यांच्या लीलांचे कौतुक, त्यांना शिकविण्याचे कौतुक आहे, तेवढे कुठेही नसेल ! रामाचा काळ सोडून दिला तर नंतर रामायणातल्या गोष्टी व गाणी मुलांना आपण सांगत आलो आहोत. इतिहासाचा अभिमान बाळगणाऱ्यांना मी हे सांगतो आहे. असो.

एकूण आमची ही पुण्याबाहेरची-पुण्याच्या काही मंडळींनी केलेले कार्य पाहण्यास गेलेली संध्याकाळ फारच छान गेली. एस. टी.त खूप गप्पा झाल्या. म्हणजे जाता येताना मी फादर मॅथ्यु लेदरलेंशी बोललो. हा जर्मन माणूस आता भारताचा नागरिक झाला आहे. मी त्याला काही विचारले-त्याने मला काही विचारले. लेदरलेसारख्यांची विचारसरणी काय असते ती ऐकण्याजोगी असते. भारतीय समाजाबद्दल त्यांना जे वाटतं ते आपल्या मनात येणं कधीच शक्य नाही; पण ते सर्व पुन्हा केव्हा तरी आणखी एखाद्या निमित्ताने सांगेन. दरम्यान एवढेच सांगतो की वाटेत एका गावी येथे रस अतिशय उत्तम मिळतो. तुम्ही या रस्त्याने गेलात तर तो घ्याच. येथे उसाच्या कांडयांची साले सोलतात. त्यामुळे रसाचा रंग सुंदर पारदर्शक हिरवट होतो. या रसाआधी ट्रस्टने बरोबर आणलेली भेळ आम्ही खाल्ली. फक्त वाईट एवढेच की, शिरूरच्या ज्या भजांबद्दल मी एवढे ऐकत आलो ती मात्र ट्रस्टने आमच्यापासून दूर ठेवली !

◻

# केंद्र-राज्य संबंध

## सत्तारूढ पक्षाची पाउले !

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या कार्यपद्धतीत काही बदल झालेला नाही हे पहिल्यांदा दोन महिन्यांच्या त्यांच्या राजवटीवरून स्पष्ट झाले असून इंदिरा गांधी बदलल्या आहेत किंवा बदलतील असे जे म्हणत होते, त्यांचाही भ्रमनिरास झाला असेल; पण आपल्या राजकीय सोयीसाठी ज्यांनी स्वतःचीच दृष्टी बदलली आहे त्यांनाच फक्त इंदिरा गांधी बदललेल्या दिसतात. आकाशवाणी दूरदर्शन या संपर्कमाध्यमांना स्वायत्तता देण्याचे नाकारून या माध्यमांवरची सत्ता सोडायला इंदिरा सरकारची कशी तयारी नाही हे मी मागील एका लेखात स्पष्ट केलेच. केन्द्र-राज्यसंबंधाच्या प्रश्नातही त्यांची हीच वृत्ती स्पष्टपणे दिसून येऊ लागली आहे.

जानेवारी १९८० च्या लोकसभा निवडणुकीत दोनतृतीयांश जागा जिंकून केन्द्राची सत्ता आपल्या हाती आणल्यानंतर राज्यसरकारे आपल्या पक्षाच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या हालचाली इंदिरा गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केल्या. धोरण व कार्यक्रमात सुसूत्रता राहण्याचे दृष्टीने केंद्र व राज्यात एकाच पक्षाच्या हाती सत्ता असणे केव्हाही चांगले; पण हे स्वाभाविकपणे आणि संबंधित राज्यातील लोकांच्या इच्छेनुसार घडले पाहिजे, फोडाफोडीने सत्तारूढ पक्षाला अल्पमतात आणून व आपले बहुमत करून नव्हे. काही राज्यांत भिन्न पक्षांची सरकारे असली तरी तेथील लोकांचा निर्णय म्हणून ती मान्य करायला हवीत. केन्द्रातील सत्तारूढ पक्षापेक्षा मित्रपक्षाची सरकारे काही राज्यांत अधिकारावर येण्याची शक्यता संघराज्याच्या कल्पनेत गृहीत धरलेली आहेत.

केरळमध्ये १९५७ च्या निवडणुकात कम्युनिस्टांचे सरकार प्रथम अधिकारावर आले तेव्हा त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र-

प्रसाद यांनी त्यांचे स्वागत केले होते आणि केन्द्र व राज्यात भिन्न विचारप्रणालीची सरकारे असली तरी ती सहकार्याने काम कसे करू शकतात हे आपण दाखवू या, अशी अपेक्षा व्यक्त केली होती; पण दोन वर्षांनी राजेंद्रबाबूंनाच केरळच्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाने बहुमत गमावले नसतानाही मंत्रिमंडळ व विधानसभा बरखास्तकरण्याचा आणि तेथे राष्ट्रपतींची राजवट आणण्याचा जाहीरनामा काढावा लागला. निवडणुकांत रीतसर बहुमत मिळवून लोकशाही मार्गाने प्रस्थापित झालेले कम्युनिस्ट सरकार पाडण्यासाठी काँग्रेस प्रजासमाजवादी पक्ष आणि मुस्लीम लीग यांनी संयुक्त आघाडी उभारून त्या वेळी आंदोलन केले होते आणि काँग्रेसच्या अध्यक्षा असलेल्या इंदिरा गांधींनी त्यास पाठिंबा दिला होता. केरळमधील कम्युनिस्ट सरकारच्या हातूनही काही चुका झाल्या होत्या. सत्तेचा पक्षासाठी गैरवापर केल्याचे आरोप त्यांच्याविरुद्ध करण्यात आले होते, पण अशाच प्रकारचे आरोप इतर राज्यांतील काँग्रेस मंत्रिमंडळाविरुद्धही करता येण्यासारखे होते. केंद्रात व राज्यात सर्वत्र एकाच काँग्रेस पक्षाकडे सत्ता हवी. कोणत्याही राज्यात विरोधी पक्षाचे सरकार नको ही इंदिरा गांधींची वृत्ती तेव्हापासून दिसून आलेली आहे. कम्युनिस्ट सरकार बरखास्त करण्यास पंडित नेहरू अनुकूल नव्हते; पण कन्येने मोठे आंदोलन उभारून त्यांना तयार केले असे म्हटले जाते. राष्ट्रपति–राजवट आणण्याचा निर्णय राजेंद्रप्रसादांना तरी मान्य होता की त्यांनी अनिच्छेने संमति दिली हे त्यांचा पत्रव्यवहार अभ्यासकांसाठी खुला झाल्यावरच सांगता येईल; पण केन्द्र–राज्य संबंधाच्या दृष्टीने एक अनिष्ट पायंडा त्या वेळी पाडला गेला आणि केंद्रात सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाची तीच वृत्ती नंतरही अनेक प्रसंगी दिसून आली.

जानेवारी १९८० च्या निवडणुकीनंतरही ही वृत्ती बदललेली नाही. केंद्रात सत्ता मिळविल्याबरोबर राज्ये काबीज करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यासाठी पहिला मार्ग फोडाफोडीचा अवलंबण्यात आला. कर्नाटक, हरियाना आणि हिमाचलप्रदेशात मोठ्या प्रमाणात पक्षांतर घडवून आणवून इंदिरा काँग्रेसने तेथे आपली सरकारे आणली. जेथे हे शक्य नव्हते त्या नऊ राज्यांच्या विधानसभा बरखास्त करण्यात आल्या. तेथील राज्यकारभार घटनेनुसार चालविणे शक्य नाही अशी राष्ट्रपतींची खात्री झाल्याने घटनेतील तरतुदीनुसारच तेथे राष्ट्रपतींची राजवट आणण्यात येत आहे असे समर्थन करण्यात आले. राष्ट्रपतींकडे याबाबत राज्यपालांचे अहवाल आले होते का? राष्ट्रपतींच्या जाहीरनाम्यात तसा उल्लेख नाही. अर्थात अहवाल आल्यानंतरच राष्ट्रपतींना याबाबत निर्णय घेता येतो असे बंधन घटनेत नाही. घटनेनुसार कारभार चालविणे शक्य नाही याबाबत अन्य मार्गाने मिळविलेल्या माहितीने राष्ट्रपतींची खात्री झाली असेल तरी राष्ट्रपतींची राजवट ते लागू करू शकतात. येथे अन्य मार्गाने मिळालेली माहिती याचा अर्थ केंद्र सरकारकडून मिळालेली माहिती हाच होऊ शकतो. कारण राष्ट्रपतींजवळ माहिती मिळविण्याची अन्य साधने नाहीत. केवळ केंद्र सरकारच्या माहितीवर विसंबून राष्ट्रपतींनी हा अधिकार वापरणे योग्य नाही. आपल्याला नको असलेली विरोधी पक्षांची सरकारे सत्तेवरून दूर करण्यासाठी केंद्र या मार्गाचा उपयोग करू शकेल. त्याच्या हाती हे शस्त्र ठेवणे धोक्याचे आहे. घटनेतील तरतुदीतून हा पर्याय काढून टाकला पाहिजे आणि राज्यपालांचा अहवाल आल्यानंतरच त्याचा विचार करून राष्ट्रपतींनी निर्णय घ्यावा अशी तरतूद हवी. तसेच याबाबतचा निर्णय राष्ट्रपतींनी स्वतःच्या अधिकारात घ्यावा. केंद्रीय मंत्रिमंडळाची शिफारस त्यांनी बंधनकारक मानू नये, अशीही स्पष्ट तरतूद घटनेत हवी, तरच या कलमाचा केंद्रातील सत्तारूढ पक्षाच्या राजकीय फायद्याचे दृष्टीने केला जाणारा गैरवापर थांबेल. घटनेत ही दुरुस्ती करण्याबाबत सर्व लोकशाहीवाद्यांनी आणि घटनातज्ज्ञांनी आग्रह धरायला हवा.

पक्षांतराने सरकार बदलणे, विधानसभा बरखास्त करणे हे दोन मार्ग अवलंबणे शक्य नाही. तेथे केंद्रीय हस्तक्षेपास निमित्त शोधणे यावर इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांचा कट आहे. केरळ, पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा येथील कम्युनिस्ट राजवटीबाबत हे धोरण मुख्यतः अवलंबले जात आहे. केंद्राची धोरणे तुम्ही अंमलात आणली नाहीत तर तो घटनेचा अवमान समजला जाऊन धोरणे अंमलात आणणे भाग पाडण्यासाठी योग्य ती कारवाई केली जाईल अशी धमकी केंद्रीय मंत्री स्टीफन यांनी त्रिवेंद्रममध्ये काही दिवसांपूर्वी दिली. केंद्रीय गृहमंत्री झैलसिंग यांनी राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना पत्रे पाठवून आवश्यक वस्तू रास्त किंमतीत विकण्याची व्यवस्था करा असे सांगितले. पश्चिम बंगालच्या एका मंत्र्यांनी या आदेशावर टीका केली. आवश्यक वस्तूंचा पुरेसा पुरवठा करण्याची व्यवस्था केल्याशिवाय रास्त किंमतीत त्यांची विक्रीची व्यवस्था करणे राज्य सरकारांना कसे शक्य आहे? आणि पुरवठ्या बाबत राज्य सरकारांच्या हातात काय आहे? केंद्र सरकार आम्हाला साखर पुरविणार आहे का? ती पुरविली तर आम्ही जरूर रास्त किंमतीत विकू असे या मंत्र्यांनी सांगितले. त्याला समाधानकारक उत्तर केंद्राकडून मिळालेले नाही.

पश्चिम बंगालमध्ये इंदिरा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विद्यार्थीसंघटनांनी आसाममधील आंदोलनाला शह म्हणून आसामकडे जाणारे रस्ते रोखण्याचे आंदोलन करण्याचे ठरविले. बंगाली विरुद्ध आसामी असे भाषिक संघर्ष यातून निर्माण होऊन पश्चिम बंगालमध्ये अशांततेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती राज्यसरकारच्या आटोक्यात राहिलेली नाही असे कारण दाखवून तेथे हस्तक्षेप करण्याला व राष्ट्रपतिराजवट आणण्यास निमित्त शोधणे हा यामागे उद्देश आहे. इंदिरा काँग्रेसच्या अशा धोरणाने केंद्र व विरोधी पक्षांची राज्ये यांच्यांत संघर्ष वाढत जाण्याचीच चिन्हे दिसत आहेत. □

# एक वस्ती अशीही !

डॉ. अनिल गोरे

घोरपडी पेठ, पुणे. व्यापारी पेठ मागे टाकायची, रेल्वेच्या क्वार्टर्स आणि इस्पितळही ओलांडायचे. मग रेल्वेमार्गाखालून कमरेत काटकोनाइतके वाकून गटार चुकवीत पार व्हायचे. कमरेला आधार देत उभे रहावे तो समोर चिंचेच्या फांदीने अर्धवट झाकलेली पाटी दिसते. महापालिका गलिच्छ वस्ती निर्मूलन कार्यक्रम वस्ती क्रमांक ४२ मदारवाडी.

त्याचं असं झालं की, योगायोगाने कलकत्याचे मानवशास्त्रज्ञ प्रा. मल्होत्रा, बी. जे. मेडिकल कॉलेजचे डॉ. काटे, जगदीश गोडबोले वगैरे मंडळींची गप्पाष्टक बैठक जमली होती. त्यात विषय निघाला मदारी मंडळींचा. लहान लहान गावांमधून नाक्यानाक्यावर पब्लिक जमवून पोतडीतून चिजा काढीत जादूची कमाल दाखवणाऱ्या मदारी मंडळीबद्दल प्रत्येक लहान मुलाला आदरयुक्त भीती असते. ‘बच्चे लोग टाली बजाओ नही तो खाना हजम नहीं होगा !’या आवाहनाला प्रत्येकाने कधी ना कधी प्रतिसाद दिलेला असतो. साहाय्यक पोऱ्याची जीभ काढून तांब्याभर रक्त इतस्ततः सांडण्याच्या प्रयोगामुळे पहाताना व नंतर झोपेतसुद्धा थरकाप उडालेला असतो. त्यामुळे गप्पा मी जरा कान देऊन ऐकू लागलो. डॉ. काटे सांगत होते की, त्यांच्या माहितीतले मदारी आफ्रिकेला जाऊन येतात. कोणी असेहि म्हणाला की, ते आफ्रिकेतून ब्लॅक मॅजिक शिकून येतात व इथे प्रयोग करून पैसे मिळवतात. हे मात्र खरे वाटेना. मदारींकडचे विदेशप्रवासाचे पासपोर्ट पाहिल्याचीही ग्वाही काटयांनी दिली. यामुळे सर्वांचेच कुतूहल चाळवले. या मंडळींना एकदा प्रत्यक्ष भेटावे अशी कल्पना निघाली.

दुसऱ्या दिवशी सगळे मोहित्यांच्या सायकल-दुकानापाशी जमलो. आमदार विठ्ठल तुप्यांनी आमची शिफारस केली आणि दुकानमालक स्वतःच आम्हाला घेऊन मदारवाडीकडे निघाले. रेल्वेरुळांपलीकडे आल्यावर मोहिते त्या पाटीकडे बोट दाखवून म्हणाले, ‘हीच ती वस्ती. पंचवीस फूट रुंद आणि अडीसशे फूट लांब सीमेंटचा रस्ता. मधे कसल्याशा झाडाचा एक पार. रस्त्याच्या दोही अंगांना छोटीछोटी पाचपन्नास घरं. कुठे तुरळक चार-दोन पोरं खेळत होती तर कुठे उंबऱ्याबाहेरच बायकांचा घोळका कामे काढून बसला होता. विशीतल्या हिप्पीकट तरुणांचा गट चकाटया मारत उभा होता.

आम्हाला पाहून ही तरुण मंडळी जवळ आली. प्रास्ताविक झाले. त्या वस्तीचे प्रमुख चौधरीसाहब (हे आडनाव नव्हे, पद) बाहेर गेले होते. मग इतर काही बुजुर्ग माणसांच्या समवेत आम्ही एका घरात बसलो. कॉट, कोच, कपाट, डोक्यावर रेल्वेडब्यासारखा पंखा. एकंदर सुखवस्तू घर वाटत होते. एका सत्तरीच्या गृहस्थांबरोबर गप्पा सुरू झाल्या.

‘आम्ही मदारी सगळे मुसलमान. हिंदुस्थानात आमच्या जमातीची पंधरा-वीस हजार माणसे असतील. त्यापैकी निदान या भागातील तरी आमची वस्ती म्हणजे हेड-क्वार्टरच म्हणाना. (आपल्या गावाचा प्रत्येकालाच अभिमान असतो. त्यातून होणारी अतिशयोक्ती नसेल ना ?) होय. अहमदनगरमधे मढीला पीराचं देवाचं करायला अनेक मदारी जमतात; पण त्यांचे-आमचे फारसे संबंध आता नाहीत. ते लोक दारू पितात, दंगाधकेडा करतात हे आम्हाला मान्य नाही. (बहुसंख्य मदारी भटके आहेत तर घोरपडीकर मदारी स्थायिक झाले. त्यामुळे तर हा दुरावा निर्माण झाला नसेल ना ?) आमच्या वस्तीवर कोणी दारू पीत नाही. प्यायला तर त्याला आम्ही काढून लावतो. पोलिसखात्यात आमचे काहीच रेकॉर्ड नाही. साहब, हमारी जिंदगीके दो बुनियादी उसूल हैं. एक इज्जतकी रोटी खाना और दूसरा देसका नाम ऊँचा करना !’

देशाची इभ्रत वाढवता म्हणजे करता करी काय ?

‘आम्ही जगभर फिरतो. सात सालकी उम्र थी तबसे हमारे वालिदके साथ हमारा घूमना शुरू हुआ. तो पूरी दुनियाकी सफर हो चुकी है. पहिलं महायुद्ध झालं तेव्हा आम्ही फिलिपिन्समधे मनिला इथे होतो आणि दुसरं महायुद्ध सुरू झालं तेव्हा पनामा सिटीमधे अडकून पडलो. तुम्हाला आश्चर्य वाटतंय ? हे पहा माझे पासपोर्ट ब्रिटिश काळातले आणि स्वातंत्र्यानंतरचे. ही पहा ठिकठिकाणच्या लोकांनी दिलेली शिफारसपत्रे ’ चाळीस सालचे एक वेस्ट इंडीजमधील त्रिनिदादच्या माणसाचे शिफारसपत्र मी पाहिले. दुसरे सत्तर साली सेशेल्स (Seychelles) बेटाच्या अधिकाऱ्याने लिहिलेले पत्र. त्यात त्याने म्हटले की, आपण जरूर आमच्या देशाला या. व्हिसा वगैरे निश्चितच देऊ. ‘साब, हम सेशेल्स नही गये क्योंकी करीबन् उसी वक्त आर्मी के अफसरोंने हमे हर महीने दो हजार रुपये तनखा देकर बुलाया दो सालके लिये.’ तेही पत्र आम्ही पाहिले.

दरम्यान माझी ६-७ वर्षांपूर्वीची आठवण जागी होत होती. सिंगापूरला आम्ही एक करमणुकीचा कार्यक्रम बघायला गेलो होतो. त्यात नागाचा खेळ करून दाखवणारा माणूस हिंदी बोलणारा होता म्हणून मी त्याची विचारपूस केली होती. तो म्हणाला, ‘मी हिंदुस्थानात पुण्याचा !’ माझी तर विकेटच गेली होती. पुण्याला कुठे ? तर म्हणे घोरपडीला; पण मी जन्मात कधी घोरपडी पेठ पाहिली नसल्यामुळे तो विषय तेवढयावरच राहून गेला होता. तो या मदारी वस्तीतला तर नसेल ? मी विचारले.

‘हां साब, यहाँके कितने लोग मलेशिया और सिंगापूर जाकर रोजी कमाते हैं. ये दो भी उनमेंसे हैं.’ त्या बैठकीतच दोन माणसे तिकडली निघाली. मी तोडकंमोडकं मले भाषेचं ज्ञान तिथं वापरलं. ते दोघं तर चांगलेच मले भाषा बोलत होते.

‘तुम्ही आफ्रिकेलाही जात असाल ना ?’

‘हां जरूर. क्यों नहीं ? हम स्वाहिली बोल भी सकते हैं.’ मग तिथल्या लोकांची जादू आणि तुमची जादू यात काही फरक आहे का ? त्यांच्याकडून काही शिकण्यासारखे

आहे का? तसे काही दिसले नाही. म्हणजे आमचा ब्लॅक मॅजिक शिकण्याबद्दलचा तर्क बरोबर नसावा.

'तो साब इस तरह हम दुनियामें घूमते हैं. मौका मिलनेपर अपना कमाल दिखाते हैं. ऊपरवालेकी दुआ है कि हमारी जुबान में ऐसी मिठास है जिससे सुननेवाले का दिल बहलाता है और हाथमें ऐसी काबिलियत है कि देखनेवाला दातोंमें उंगली दबाता है. लोग हैरान होकर कहते हैं, आप कमालके आदमी हैं, कहाँसे आये? तो हम सिर उठाकर जवाब देते हैं 'इंडियासे!' और साब, हम सिर्फ पैसे कमाते नहीं, कितनी जगहों में चॅरिटी शो करके वहाँ के गरिबों के लिये दाम देते भी हैं!'

तुमच्या वस्तीतील तरुण मुले काय करतात?

'वही तो रोना है साहब. तशी ही मुलं आम्हा म्हाताऱ्यांना मानतात, आमचं ऐकतात; पण त्यांच्या आवडीनिवडी बदलल्या. लांब केस ठेवावेत, विचित्र कपडे घालावेत! इथपर्यंतचे वेगळेपण ठीक आहे; परंतु बापदादांच्या व्यवसायाबद्दल त्यांना आता आस्था वाटत नाही. जादूगारी करण्यात कमीपणा वाटतो. प्यून, क्लार्क असल्या बाबूटाइप नोकऱ्या कराव्यात असे त्यांना वाटते. हे वाढत गेले तर पुढच्या पिढीत आमची कला लुप्त होऊन जाईल हेच दुःख आहे!'

आमची तर कल्पना होती की, जादूगाराचा धंदा म्हणजे मोठाच ग्लॅमरस. के. लाल, पी. सी. सरकार, जादूगार रघुवीर इत्यादींचे कार्यक्रम आणि संगीत, नृत्य, नाट्य अशा कलांचे कार्यक्रम यात प्रतिष्ठेच्या दृष्टीने फरक का असावा? की या तरुण मुलांना प्रसिद्ध जादूगारांच्या जवळपास पोचण्याची आशा वाटत नसावी?

बड्या जादूगारांचा उल्लेख केल्यावर म्हातारबुवा जरा उसळले. त्यांचा सगळा पैशाचा खेळ आहे साहेब आणि त्यात पोरी नाचवतात! आधी प्रेक्षकांपासून खूप दूर स्टेजवर राहायचं. तऱ्हेतऱ्हेचे लाइट इफेक्टस् वापरायचे आणि मग ट्रिक करून दाखवायची. आम्ही कसे, प्रेक्षकांच्या मधेच बसून कोणत्याही मदतीविना फक्त हातांची कमाल दाखवतो. हे सांगताना म्हातारबुवांना प्रात्यक्षिक दाखवण्याची सुरसुरीच आली. दुखऱ्या कमरेला आधार देत स्वारी उभी राहिली. खिशातून एक रुमाल काढला. एक अंगठी मागून घेऊन रुमालात धरली. रुमालाला इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्वाहिली भाषेत काय म्हणतात हे सांगून झालं. मग एक पेन व रुमाल मागून घेऊन पेनला रुमाल बांधला. इकडे पहिल्या रुमालातील अंगठी अदृश्य झाली होती. ती सापडली दुसऱ्या रुमालातील पेनमध्ये अडकवलेली. ८ बाय ६ च्या खोलीत दाटीने बसलेल्या दहा-पंधरा जणांसमोर केलेली ही हातसफाई आम्हाला थक्क करून गेली; पण लगेच म्हातारबुवांनी गाडी रुळावर आणली. ते म्हणाले, साहेब, छोट्या जादूगाराला स्टेटस नाही. स्टेटस मिळाल्याशिवाय आमची पोरं या धंद्यात राहायची नाहीत.

बाकी इतर अडचणी काय आहेत तुम्हाला?

मग फार काही अडचणी नाहीत साहेब. पोरं मुन्सिपाल्टिच्या शाळेत शिकतात. नमाज पढायला जवळच्या मशिदीत जातात. शिवाय इतर धार्मिक कामांसाठी वस्तीवरही सोय होते. (आम्ही परतताना आम्हाला भव्य चेहऱ्याचे, शुभ्र रुळणाऱ्या दाढीमिशांचे मौलवीसाहेब पुलाखाली भेटलेसुद्धा). दवादारूसाठी ससूनला जातो. मुन्सिपाल्टीने वस्ती कशी सुधारली हे तुम्ही डोळ्यांनी बघताच. आमचे जुने कार्पोरेटर तायप्पासाहेब लाख माणूस होता. त्यानं आमच्यासाठी फार प्रयत्न केले. पण गेल्या बर्षीच्या इलेक्शनमधे बिचारा हरला. त्यामुळे आमचा सुटत आलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा लोंबकळत पडला.

तो कसा काय?

असं पहा, आमच्या बायकांना पाणी फार लांबून आणावं लागतं. अगदी डोळ्यात पाणी येतं पहा. तायप्पासाहेबांच्या मध्यस्थीनं आमच्या इथं टाकी बांधली गेली; पण नळ तिथवर जोडायचा राहिला. आता त्याकडे बघायला कोणी तयार नाही.

तुमचे चौधरीसाहेब हे काय प्रकरण आहे?

आमच्यातल्या एका हुशार जाणकार माणसाला आम्ही पुढारी म्हणून निवडतो. वस्तीबाहेरच्या माणसांशी वस्तीतर्फे त्याला चांगलं बोलता आलं पाहिजे, अडचणी सांगता आल्या पाहिजेत. त्यालाच चौधरीसाहेब म्हणायचं.

मनात विचार आला, खरंच किती ही आगळी आणि शहाणी मंडळी. सामान्यपणे ज्याच्या हाती बडगा तो प्रमुख ही आपली रीत. कदाचित छोट्या गटांमधे असुरक्षिततेच्या पोटी असे सामूहिक शहाणपण जात्याच येत असेल. आपण संख्येने अनुल्लेखनीय आणि समाजरचनेच्या दृष्टीने दुय्यम गटांकडे उपेक्षेनेच पहातो. वस्तुतः आजच्या समाजशिक्षणाच्या प्रक्रियेमधे मदारीसारख्या गटांचा खूप उपयोग होणे शक्य आहे. प्रौढ साक्षरता, कुटुंबकल्याण, जाणीवजागृती अशा विविध मोहिमांचे रंजकतेचा चंचुप्रवेश शाहीर, तमासगीर, कीर्तनकार, जादूगार यांच्यासारख्या मंडळींकरवी होऊ शकतो. सुदैवाने मदारींच्या जादूगारीमधे भंपकपणा, बुवाबाजी नाही. 'साहब, स्टेजपरसे फुंक मारके आदमी आँखोंके सामने गायब हो जाए, क्या ये मुमकिन है? भगवान भी यह नहीं कर सकता तो इन्सान क्या करेगा? सब हातसफाईका कमाल है!' ही त्यांची भूमिका. त्यामुळे आपल्याला वेताळ वश आहे, कामनापूर्तीचे ताईत विकत घ्या वगैरे प्रकार तिथे नसावेत. म्हणून सामाजिक कार्यामधे त्यांचा उपयोग करून घेणे अगत्याचे आहे.

केवळ कला म्हणूनही मदारींच्या जादूगिरीचे संवर्धन व्हावे असे वाटते. त्याकरता दोन गोष्टी झाल्या पाहिजेत. एक म्हणजे आश्रय आणि दुसरी आदर. जादूगिरीतून पुरेसे उत्पन्न झाले पाहिजे. अपेक्षा फार नाही. कनिष्ठ मध्यमवर्गाचे रहाणीमान पुरेसे व्हावे. हा आश्रय मिळाल्यानंतर केवळ पोटाच्या गरजेपायी पारंपारिक पेशा सोडणे थांबेल; पण निव्वळ आश्रय पुरेसा नाही. प्रतिष्ठाही हवी. सुशिक्षित, उच्चभ्रू, प्रतिष्ठित माणसे हे कार्यक्रम चवीने पहातात व कलाकाराचे कौतुक करतात हे दिसू लागले तर मदारी तरुण प्यून वगैरे होण्याची महत्त्वाकांक्षा ठेवणार नाहीत. उद्योगसमूह, संस्था किंवा व्यक्ती मनोरंजनासाठी बाजूला ठेवलेल्या रकमेचा छोटा भाग मदारींच्या कार्यक्रमासाठी खर्च करू शकतील. हल्ली मी माझ्या विविध क्षेत्रांतील परिचितांना सांगतो की तुमच्याकडे एखादे संमेलन, पार्टी, समारंभ होणार असेल तर मदारींचा तासाभराचा कार्यक्रम ठरवा. मी तुम्हाला त्यांच्याकडे घेऊन जाईन. कोणी ऐकेल की नाही? कोण जाणे. आपण सांगत रहावे. ☐

**हिंसक प्रकार घडले असले तरी सर्वसाधारणपणे हे आंदोलन शांततेनेच सुरू आहे असे म्हणावे लागेल....**

# अस्वस्थ आसाम

**लेखांक चौथा**

**विनय सहस्रबुद्धे**

गेल्या जानेवारीत साऱ्या देशात निवडणुकीची धामधूम सुरू होती तर आसाम मात्र आंदोलनाच्या धुमश्चक्रीत होता. आसामात निवडणुका होणार नाहीत, निवडणुका घेण्याचा कुठला प्रयत्न संतप्त जनता सहन करणार नाही ही गोष्ट पुरेशी स्पष्ट होती. १० डिसेंबरला, उमेदवारीअर्ज भरण्याची मुदत संपताना १४ पैकी १० मतदारसंघात उमेदवारीअर्ज दाखल झालेले नाहीत किंवा होऊ शकले नाहीत, ही एकच बाब असमिया जनतेचा वज्रनिर्धार स्पष्ट करण्याइतकी बोलकी होती. तरीही दुर्दैवाने ही गोष्ट मुख्य निवडणुक आयुक्तांच्या लक्षात येऊ शकली नाही. ज्या ठिकाणी अर्ज आले आहेत तिथे आम्ही निवडणूक घेतल्याशिवाय राहणार नाही, अशी डरकाळी फोडून आयुक्त मोकळे झाले. अखेर आधी मावळते मुख्यमंत्री जोगेंद्रनाथ हझारिका आणि राष्ट्रपती राजवट लागू झाल्यावर राज्यपाल लालनप्रसाद सिंग या दोघांनाही आयुक्तांकडे शिफारसी कराव्या लागल्या, तेव्हा कुठे शकधरसाहेब शांत झाले. दरम्यान सुमारे ९५ दिवसांच्या राजवटीनंतर श्री. जोगेंद्रनाथ हझारिका यांचे सरकार अल्पमतात आले आणि अखेर १२ डिसेंबरला आसामात राष्ट्रपती राजवट लागू झाली, हा संदर्भ जाता जाता लक्षात ठेवला पाहिजे.

३ जानेवारीला देशभर लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होत असतानाच आसामच्या उत्तर भागात, विशेषत: उत्तर कामरूप जिल्ह्यात बांगलादेशी घुसखोर व असमियांमध्ये छोट्यामोठ्या चकमकींना सुरुवात झाली. स्थानिक पोलिसांना आवरता येऊ नये असा हिंसक जमाव जमल्याने वातावरण तंग झाल्याच्या घटनाही काही ठिकाणी घडल्या. या सर्व हिंसक घटनांचं केंद्र प्रामुख्याने गौहातीपासून पन्नास-साठ मैलावरचं नलबारी हेच होतं. नलबारी नजीकच्याच बारिकाडुंगा गावात ३ जानेवारीस आंदोलन करणारे तरुण आणि बंगाली हिंदू गावकऱ्यात चकमक उडाली. असमियांच्या आंदोलनातील हिंसेचा अध्याय जिथून सुरू होतो तेथे या घटनेबद्दल आसामात उलटसुलट माहिती कानावर आली. 'आंदोलनाच्या समर्थक युवकांनी गावकऱ्यांना वर्गणी देण्याबाबत दमदाटी केली' असं काहींचं म्हणणं आहे तर 'शांतपणे मिरवणुकीने चाललेल्या विद्यार्थ्यांवर बंगाली गावकऱ्यांनी दगडफेक केली' असा विद्यार्थी संघटनेचा दावा आहे. काहीही असो, या हिंसक प्रकारात १५० घरे जळाली, अनेकजण जखमी झाले तर नलबारीचाच रहिवासी सोळा वर्षांचा दिलीप हुजरी गंभीर जखमांनी घायाळ होऊन अखेर मरण पावला. खरगेश्वर तालुकदार नंतर, आंदोलनाने घेतला हा आणखी एक बळी !

जानेवारीच्या चार तारखेस मध्यमबासका या आणखी एका गावात छोटयामोठया चकमकींनंतर वातावरण तंग बनलं. परिणामत: संध्याकाळपासूनच सबंध उत्तर कामरूप जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली. सबंध जिल्हाच संचारबंदीखाली आणण्याचं आणखी एक कारण म्हणजे पश्चिम बासका, बातहिगिला, नलबारी या ठिकाणी जाळपोळ आणि लुटालुटीचे काही प्रकार आदल्याच दिवशी घडले होते, असंही सांगण्यात येतं.

संचारबंदी लागू करण्याबरोबरच दि. ७ जानेवारीला राज्यपाल श्री. लालनप्रसाद सिंग यांनी उत्तर कामरूप जिल्हा 'अशांत प्रदेश' म्हणून घोषित केला. इतकं करूनही गावागावातून छोटयामोठया दंगली आणि हाणामाऱ्या सुरूच होत्या. अनेक ठिकाणांहून जाळपोळीच्या बातम्या येत होत्या व एकूण परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर जाणे सहज शक्य होते, म्हणूनच अखेर ८ जानेवारीला नागरी प्रशासन व पोलिसांच्या मदतीसाठी लष्कराला पाचारण करण्यात आले. लष्कराच्या मदतीला केंद्रीय राखीव पोलिस दलही आले आणि गावागावातून चालू असलेले हिंसक प्रकार आता तरी थांबावेत या अपेक्षेने शासन शांततेची वाट पहात बसले.

पण घडले ते नेमके उलटे ! भयग्रस्त स्थानिक नागरिकांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन लष्कराने नवीनच धुमाकूळ घालायला सुरवात केली. हिंदु-मुस्लिम किंवा असमिया-बंगाली असा कोणताही भेद न करता घराघरात घुसून काही लष्करी जवानांनी आयाबहिणींची अब्रू लुटली. ज्यांनी विरोध केला त्यांना मारझोड केली. जोडीला अत्याचाराचे इतरही प्रकार होतेच. लष्करातील काही जवानांनी हे अत्याचार सत्र आरंभिल्याने अक्षरशः आगीतून फुफाटयात सापडावे तशी गोरगरीब रहिवाश्यांची स्थिती झाली, आंदोलनातून आपलं घर वाचलं म्हणून जे बेसावध होते, लष्कराच्या हाती आपले प्राण सुरक्षित आहेत म्हणून जे समाधानी होते ते सारेजण एकजात तोंडघशी पडले ! मुस्लिम राजवटीपासून मुक्त राहिल्याने ज्यांना 'मोगलाई' या प्रकाराची कल्पनाही नव्हती त्यांना लष्करी जवानांनी संगिनींचा प्रसाद दिला आणि शाळकरी पोरींपासून साठी उलटलेल्या वृद्धेपर्यंत अनेकांची अब्रू लुटली. मस्तक सुन्न करणाऱ्या या भीषण अत्याचाराचे बळी ठरलेल्यांना भेटावं, प्रत्यक्ष या दंगलग्रस्त भागात जाऊन यावं अशी इच्छा होती. ऑल आसाम स्टुडंटस् युनियनचा कार्यालयसचिव अबू नासेर महंमद याजजवळ मी ही इच्छा बोलून दाखविली. सुदैवाने दुसऱ्या दिवशी, १७ फेब्रुवारीस एका युवक संघटनेच्या 'रिलीफ व्हॅन' बरोबर नलबारीला जाण्याची सोयही झाली.

## आसाम 'अंडर कन्स्ट्रक्शन'

गौहातीच्याच निझराबाजार या एका उपनगरातील डॉक्टरांच्या 'निझराबाजार सांस्कृतिक जुबख संघ' या संघटनेच्या वतीने औषधे आणि काही कपडे वाटण्यासाठी दंगलग्रस्त भागाच्या दौऱ्यावर जाणाऱ्या एका तुकडीबरोबर मी निघालो. या तुकडीत सुमारे वीसएक मेडिकलचे विद्यार्थी, पाच-सहा डॉक्टर्स आणि तीन महिला कार्यकर्त्या होत्या. गौहाती ते नलबारी अडीच-तीन तासांचा रस्ता आहे. या वेळेत एखाद्या पिकनिकला जावं अशा उत्साहानं निघालेली ही मंडळी दिवसभर त्यांच्या आंदोलनाबाबत मला नानाविध माहिती देत होती. आमचं आंदोलन कोणाच्याही विरोधात असं नाही, ते आमच्यावरच्या अन्यायाच्या निवारणासाठीच कसं आहे, इ. इ. मुद्दे अहमहमिकेनं मांडत होती. त्यामुळे प्रवास तर कंटाळवाणा झाला नाहीच; पण आसामातल्या सर्वसामान्य विद्यार्थ्यालाही आंदोलनामागचं ठराविक तत्त्वज्ञान अगदी तोंडपाठ आहे हेही लक्षात आलं.

हृदयानंद गोस्वामी या मेडिकलच्या शेवटच्या वर्षाचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याशी माझी चांगलीच दोस्ती झाली. हा गोस्वामी गौहातीचाच राहणारा; आंदोलनात पहिल्यापासूनच तो क्रियाशील आहे. गौहाती मेडिकल कॉलेज स्टुडंट्स युनियनचा तो अध्यक्षही आहे. 'तामूल' हा असमियाचा एक परंपरागत पानाचा प्रकार चघळत मोठ्या मुद्देसूदपणे त्यानं असमियांची बाजू मांडली. आमची बस ज्या रस्त्यावरून जात होती तो रस्ता आसामातील दोन राष्ट्रीय महामार्गांपैकी एक आहे आणि तरी देखील मुबलक खाचखळगे आहेत. नेमका हाच संदर्भ घेऊन गोस्वामीनं मला सांगितलं, "पाहिलंत हा नॅशनल हाय वे ! किती खाचखळगे आहेत ! असे अनेक महत्त्वाचे रस्ते आजही अंडर कन्स्ट्रक्शन आहेत. ब्रॉडगेज रेल्वे, पेट्रोकेमिकल्स प्रोजेक्ट, विमानतळ, ब्रह्मपुत्रेवरचा नवा पूल सारं काही वर्षानुवर्षं 'अंडर कन्स्ट्रक्शन' आहे. तुमचा महाराष्ट्र आज स्वतःच्या पायावर उभा आहे, आमचा आसाम मात्र अजूनही 'अंडर कन्स्ट्रक्शन'च आहे !"

वाटेत हाजू नावाच्या एका गावात आम्ही थोडा वेळ थांबलो होतो. गाडी थांबल्याबरोबर सात-आठ वर्षांची दोन मुलं भीक मागत समोर आली. त्या मुलांकडे बोट दाखवीत गोस्वामीनं सांगितलं, "ते बघा, काही वर्षांपूर्वी आसामात एकही भिकारी नव्हता, आज शेकडो झाले आहेत ! केंद्राने आमच्याकडे सतत दुर्लक्ष केलं, त्याचाच हा परिणाम !"

केंद्र सरकारनं आपल्यावर भीषण अन्याय केलाय आणि उभ्या भारताला आसामची काहीही पर्वा नाही ह्या दोन बाबी आसामात सर्वांकडून ऐकायला मिळतात. उर्वरित भारताला आसामची पर्वा नाही या म्हणण्यात अर्थ नाही. कारण तसं असतं तर महाराष्ट्रातून एका साप्ताहिकाने मला आसामात कशाला पाठवलं असतं ? असा प्रश्न मी विचारला; पण त्याने त्याचं समाधान झालं नाही. सुकुमार बोरा या विद्यार्थ्यानं तावातावानं भांडत मला सांगितलं की, मागे कधी तरी मुंबईच्या इलेस्ट्रेटेड विकलीनं राज्याराज्यांचा परिचय करून देणारी एक लेखमाला प्रसिद्ध केली होती. त्यात चिमुरड्या नागालॅंडचा परिचय होता; पण आसामबद्दल एक ओळही नव्हती ! इतके बारीकसारीक संदर्भ या विद्यार्थ्यांनी गोळा केले आहेत आणि त्या बळावर एखाद्या वकिलानं मांडावी तशी 'जय आई आसाम'ची कैफियत ते उत्साहानं सादर करतात.

विश्वनाथ बारफुकन या एका विद्यार्थ्यानं सतत तासभर अशीच कैफियत माझ्यापुढे मांडली. तेव्हा 'आसामच्या सध्याच्या मागासलेपणाला असमियांनीच निवडून दिलेले नेते जबाबदार आहेत आणि त्यांना तुम्ही एकदाच नव्हे तर अनेकदा निवडून दिलं आहे ! असं आहे तर आसामच्या आजच्या अवस्थेला काही प्रमाणात असमिया जनताच जबाबदार नाही का ?' असा प्रश्न मी विचारला. त्यावर क्षणभर थांबून तो म्हणाला, 'तुम्ही म्हणता ते खरंय ! आमचे नेते

आणि वारंवार त्यांनाचा निवडून देणारे आमचे आई–वडील दोघेही सारखेच जबाबदार दोषी आहेत !' जो अन्याय आणि जी उपेक्षा एका पिढीनं सोसली ती स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या नव्या पिढीला सहन होणार नाही हेच जणू विश्वनाथच्या बोलण्यातून सूचित होत होतं.

अर्थात जवळजवळ सर्वांनाच आंदोलनामागची ठराविक तात्विक भूमिका तोंडपाठ असली तरी त्याचा अर्थ समस्येची जाणीव किंवा सखोल Understanding सर्वांनाच आलं आहे असा नाही. 'आमच्या-वर एवढा अन्याय होत असताना आज नाही पण दोन वर्षांनी भारतापासून फुटून निघण्याची भाषा आम्ही बोललो तर त्यात चूक कोणती?' असा एक उथळ विचारही काहींनी बोलून दाखविला; पण हा फुटून निघण्याचा विचार तर्कशुद्ध कसा आहे किंवा तो कित-पत व्यावहारिक आहे इ. प्रश्नांना त्यांच्याजवळ उत्तरं नव्हती.

¤

दंगलग्रस्तांना मदत करणाऱ्या तुकडीबरोबर नलबारीच्या वाटे-वरच असलेल्या मुकलमुआ या एका छोटया गावात आम्ही पोचलो. मुकलमुआच्या वेशीवरच एका माध्यमिक शाळेत दंगलीमुळे निर्वा-सित झालेल्या सुमारे ५०० व्यक्तींना आसरा देण्यात आला आहे. ही निर्वासितांची छावणी दिसताच गाडी थांबवून भराभरा औषधांची खोकी बाहेर काढण्यात आली. तुकडीचे नेते डॉ. दास आणि एक समाजसेविका राणी मंगलादेवी प्रभृती खाली उतरले. एव्हाना निर्वासितांची कच्चीबच्ची आमच्या गाडीभोवती गोळा झाली होती. इतर डॉक्टरमंडळी औषधं वाटायला सुरुवात करणार इतक्यात डॉ. दास धावत आले आणि 'या निर्वासितांना आपल्या मदतीची जरुरी नाही. हे सर्व बांगलादेशी आहेत आणि त्यांना सरकारकडून आधीच मदत मिळाली आहे' इ. सांगून पुढच्या छावणीवर जाण्याचा आदेश त्यांनी दिला. या सगळ्या धावाधावीची राणी मंगलादेवींना काहीच कल्पना नव्हती. त्या आपल्या एकीकडे 'दुःखितांचे अश्रू' पुसत होत्या आणि दुसरीकडे त्यांच्या एका सहकाऱ्याला आपण निर्वासितांची चौकशी करीत असतानाचे फोटो व्यवस्थित 'अँगल' मध्ये घेण्याची सूचना करीत होत्या. आपण ज्यांची विचार-पूस करतोय ते असमिया नव्हेत तर बंगाली आहेत ही बातमी सम-जताच 'दीज नास्टी इन्फिल्ट्रेटर्स' ... इ० गालिप्रदाने करीत आणि अंगावरची शाल सावरत त्या गाडीत येऊन बसल्या. राणी मंगलादेवींची ही दिखाऊ समाजसेवा पुढे आम्हा सर्वांच्याच उपहासाचा विषय बनली. एकूण महाराष्ट्रात काय किंवा आसामात काय 'सोसायटी लेडीज'च्या समाजसेवेची जात एकच !

मुकलमुआच्या छावणीत केवळ बंगाली निर्वासित आहेत, एव-ढ्यावरून एका वैद्यकीय पथकानं उपचार वगैरे न करताच परत फिरावं हीं घटना बोलकी आहे. बंगाली असोत किंवा असमिया असोत, मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांनाही मदत करण्यात काय अडचण होती? बंगाल्यांच्या जखमा कोरडया असतात आणि असमियांचंच फक्त रक्त वाहात असतं? पथकाचे नेते डॉ. दास यांना मी जेव्हा हे प्रश्न विचारले तेव्हा 'त्यांना सरकारी मदत मिळाली आहे' वगैरे थातुरमातुर उत्तरं देऊन त्यांनी बाजू सावर-ण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. आसामात याआधी घडलेल्या आणि आजही घडत असलेल्या अशा छोटयामोठया घटनांमधून असमिया आणि बंगाल्यांमधली भिंत दिवसेंदिवस पक्की होत आहे.

## दंगली, अत्याचार

मुकलमुआहून पुढे एका कच्च्या रस्त्याने आम्ही बैठाभांगा या एका गावबजा वस्तीत आलो. दोघेजण पुढे जाऊन दंगलग्रस्त नेमके कोण आहेत, याची चौकशी करून आले. ते असमियाच आहेत याची खात्री झाल्यावर लगबगीनं सगळे डॉक्टर्स उतरले आणि तपासणी, विचारपूस, उपचारादी गोष्टी सुरू झाल्या. सुमारे दोनशे लोकसंख्येच्या या छोटया वाडीत पन्नासहून अधिक कुटुंबे आहेत. आम्ही गेलो तेव्हा गावात सर्वत्र झोपडया जळाल्याची साक्ष दिसत होती. सुमारे आठदहा रात्री उघडयावर काढल्यानंतर थोडीफार सरकारी मदत इथल्या रहिवाशांना मिळाली आणि आता घरं बांधण्याचं काम सुरू झालं आहे. याच गावच्या शांतीराम देका या सत्तरीला टेकलेल्या वृद्धानं अत्याचारांची हकीगत सांगताना शर्ट काढून आपल्या अंगावरच्या जखमा दाखवल्या. त्याच्या सांगण्या-नुसार हल्लेखोर २७ जानेवारीच्या रात्री आले. त्यांनी आधी लाठ्याकाठ्यांनी मारहाण केल्यानंतर चीजवस्तू लुटून नेली, शेतात कोबी, फ्लॉवर किंवा अन्य फळभाज्या लावल्या होत्या, ती सगळी रोपं उपटून नेली. वस्तीतल्या लोकांनी बांधलेलं श्रीकृष्णाचं एक देऊळ–ज्याला नामघर म्हणतात–फोडलं, आतली मूर्ती फेकून दिली. काही जणांनी सरळ धान्याच्या कोठीवर हल्ला केला आणि अक्षरशः एकही कण शिल्लक ठेवला नाही ! गावकऱ्यांनी प्रतिकाराचा प्रयत्न केला तेव्हा उभ्या वस्तीला आग लावून देऊन हल्लेखोर पसार झाले. पुढे दोन दिवसांनी पोलीस आले आणि रीतसर चौकशी वगैरे होऊन मदतकार्यही सुरू झालं. धुवून नेलेली धान्याची गुदामं, उध्वस्त शेतं, जळालेल्या घरांचे अवशेष, कोसळलेलं नामघर आणि जोडीला सहानुभूतीनं हेलावलेल्या बायाबापडयांचे आक्रोश हे सारं वातावरण भयानक होतं. शहरापासून दूर अशा अनेक वस्त्या असतील जिथल्या अत्याचारांची अद्याप सरकारदरबारी नोंदही झाली नसेल !

गावकऱ्यांच्या सांगण्यानुसार हा हल्ला मुकलमुआच्या निर्वासित छावणीत आश्रय घेणाऱ्या बांगलादेशीयांनी केला होता. पोलिसांना मात्र नेमके हल्लेखोर कोण हे अद्याप शोधून काढता आलेलं नाही.

बैठाभांगा हे दंगलीला बळी पडलेल्या शेकडो गावांपैकी एक. सामान्यपणे अशाच प्रकारचे हल्ले आणि दंगली कामरूप जिल्ह्यात सर्वत्र घडल्या. या सर्व दंगलींच्या धुमश्चक्रीत एकटया कामरूप जिल्ह्यात ४७ जण मृत्युमुखी पडले. कामरूपच्या पाठोपाठ अप्पर आसामात दिब्रुगड येथेही दंगली उसळल्या. त्यात एकूण २१ जण ठार झाले. संपूर्ण आसामात या काळात ठार झालेल्यांची संख्या अनधिकृतरीत्या ८५ एवढी सांगण्यात येते. अनधिकृत सूत्रांच्या माहितीनुसार भोसकाभोसकीचे एकूण ३७६ प्रकार घडले तर सुमारे १२०० व्यक्ती या ना त्या प्रकारे जखमी झाल्या. आसामचे पोलीस महानिरीक्षक श्री. प्रदीप दास यांनी या आकडेवारीचा इन्कार केला; पण त्याचबरोबर खरी आकडेवारीही त्यांना देता आली नाही, हे उल्लेखनीय !

कामरूप जिल्ह्यातील या दंगलीमध्ये लष्करी जवानांनीच जे अत्याचार केले त्यांच्या कहाण्या अधिकच भयानक आहेत. सुमारे शंभर आबालवृद्ध स्त्रियांवर अमानुष अत्याचार झाले. यापैकी फक्त ९ बलात्कारांची प्रकरणे पोलिसांनी अधिकृतरीत्या मान्य केली

आहेत. अर्थात बलात्कारित स्त्रियांची संख्या मोठी असणे सहज शक्य आहे, कारण बेअब्रूला भिऊन अत्याचार उघड न करणाऱ्या महिलाच बहुसंख्य आहेत.

पोलीस महानिरीक्षक श्री. प्रदीप दास आणि आसामचे मुख्य-सचिव श्री. परमसिंहन या उभयतांनी लष्कराला पाचारण करण्याच्या आपल्या निर्णयाचं जोरदार समर्थन केलं. 'लष्कर बोलावलं नसतं तर अत्याचारांचं प्रमाण अधिक वाढलं असतं,' असं या दोघांनीही सांगितलं आणि त्यांच्या या म्हणण्यात तथ्य असल्याचं अनेक तटस्थ निरीक्षकांनीही मान्य केलं. श्री. प्रदीप दास यांच्या सांगण्यानुसार बलात्काराच्या ९ प्रकरणांबद्दल अनेक लष्करी जवानांवर लष्करी न्यायालयात खटले भरले आहेत व त्यांना योग्य ती सजा होईलच. शिवाय अन्य प्रकरणातही पोलीस अधिक लक्ष घालून गुन्हेगार शोधून काढण्याच्या प्रयत्नात आहेत. मुख्यसचिव श्री. परमसिंहन यांनी या संदर्भात सांगितलेला एक मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. लष्कराच्या अत्याचारांनंतर भारतीय लष्कराविरुद्ध पद्धतशीर प्रचार आसामात सुरू आहे. 'इंडियन आर्मी रेप्ड अवर मदर्स-सिस्टर्स' अशी भित्तीपत्रकं काही ठिकाणी लागली आहेत. 'अशा पाशवी जवानांबद्दल आम्हाला का आपुलकी वाटावी ?' असे सवाल विद्यार्थिनीते विचारीत आहेत. लष्कराच्या अत्याचारांबद्दलचा असमियांचा संताप समजण्यासारखा असला तरी 'सबंध भारतीय सेनेची भारताच्याच एका प्रांतात बदनामी करण्याचे प्रयत्न देशाच्या सुरक्षिततेला धोकादायक आहेत' असं श्री. परमसिंहन म्हणाले व ते खरंच आहे. अर्थात अशा प्रयत्नांना आम्ही पायबंद घालीत आहोत, हे सांगायलाही ते विसरले नाहीत.

लष्करी जवानांच्या अत्याचारांमुळे आणि एकूणच दंगलीची तीव्रता अधिक असल्याने कामरूप जिल्ह्यातील नलबारी व अन्य भागातल्या दंगली गाजल्या; पण याचा अर्थ उर्वरित आसाम हिंसक प्रकारापासून मुक्त होता असा मात्र नाही. २२ डिसेंबरला गौहाती मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी, मूळचा सिलचरचा रहिवासी डॉ. अंजन चक्रवर्ती याला काही विद्यार्थ्यांनीच मारहाण केल्याने, मध्यरात्री होस्टेलमधील त्याच्या खोलीतच त्याचा खून झाला ! 'हा खून म्हणजे असमिया विद्यार्थ्यांनी बंगाल्यांच्या द्वेषापोटी केलेली हत्या होय' असं बंगाल्यांकडून सांगितलं जातं. अर्थात उपलब्ध माहितीनुसार या खुनामागे असमिया–बंगाली अशी द्वेषभावना असावी असं वाटत नाही. डॉ. अंजनच्या बहिणीच्या लग्नाचे एक गुंतागुंतीचे प्रकरण होते, या प्रकरणात दुखावल्या गेलेल्यांपैकी काहींचा या हत्येत हात असणे अधिक संभवनीय वाटते.

डिसेंबर–जानेवारीच्या सुमारासच नाहोरकटिया गावात आठव्या यत्तेत शिकणारा पूर्णा निर्मलिया अशाच एक हिंसक प्रकाराचा बळी ठरला. आसामविरोधी बंगाल्यांच्या एका गटाने निर्मलियावर रॉकेल ओतून त्याला जिवंत जाळले, असे असमियांकडून सांगितले जाते. लुंबडिंग या पूर्वआसामातील एका शहरात अल्पसंख्यांक असमियांचं रक्षण करणाऱ्या कमल बोरा या एका पोलिसालाही काही वनवासी आणि काही बंगालीभाई नागरिकांनी भोसकून ठार मारलं, असंही सांगण्यात आलं. या सर्वच प्रकरणातील सत्यासत्यतेतील भेदरेषा अतिशय अस्पष्ट आहेत. खऱ्या-खोट्याची बेमालूम मिसळण अनेक ठिकाणी दिसून येते. वस्तुस्थितीचा शोध घेण्यासाठी पोलीस-महानिरीक्षकांकडे चौकशी केली; पण 'तपास चालू आहे' यापलीकडे अमुक एका घटनेबद्दल अधिक काही त्यांनी सांगितलं नाही. अर्थात, अद्यापही वातावरण स्फोटक बनण्याची शक्यता असताना कोणत्याही एका गटाला प्रक्षुब्ध करणारी विधानं सरकारीरीत्या प्रसिद्ध होणं हानिकारक ठरू शकते हे लक्षात घेता, ही मुग्धता आक्षेपार्ह नाही.

## दुलियाजानची घटना

आसामातील हिंसक घटनांच्या या सत्रात दुलियाजान येथील घटना सर्वाधिक गंभीर अशी आहे. दुलियाजान येथे ऑइल इंडिया कंपनीचं पंपिंगस्टेशन आहे. इथल्या तेलविहिरीतून खनिज तेल वर खेचून बिहारात बरौनीच्या तेलशुद्धीकरण केंद्रात पंपाद्वारे नेलं जातं. एक जानेवारीपासून आसाम गणसंग्राम परिषदेच्या आदेशानुसार पंपिंगस्टेशनावर गण सत्याग्रहाचं सत्र सुरूच होतं. शेकडो महिला गटागटाने दिवसभर पंपिंगस्टेशनाचं काम बंद पाडण्यासाठी निरोधन–सत्र सुरू ठेवीत होत्या. रात्री तरुण विद्यार्थी ही कामगिरी पार पाडत. दि. १७ जानेवारीपर्यंत ही निरोधने अहोरात्र सुरूच होती. पंपिंगस्टेशनचे काम थंडावले होते आणि तेलवाहक पाइपात तेलाचा थेंबही नव्हता. आसामात सर्वच पंपिंगस्टेशनांवर ही स्थिती असल्याने खनिजतेल शुद्धीकरणाचे काम थंडावले होते. तशातच १४ जानेवारीस इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यावर केंद्र सरकारनं या परिस्थितीची गंभीर दखल घेतली. निरोधने आटोक्यात आणा, वाटल्यास हाणून पाडा; पण पंपिंग स्टेशने खुली करा, अशी नव्या केंद्रसरकारची भूमिका होती.

१८ जानेवारीस नेहमीप्रमाणे निरोधनासाठी जमलेल्या जमावाला केंद्राच्या या बदललेल्या धोरणाची कल्पना नव्हती. निरोधने सुरू होऊन पंपिंगस्टेशनच्या मुख्य फाटकापाशी शेकडो स्त्री–पुरुष जमतात न जमतात तोच जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तिथेच जाऊन अमुक एका कलमाखाली हा जमाव बेकायदेशीर असल्याचे जाहीर केले. बेकायदेशीर एकत्रीकरण हा गुन्हा असल्याने जमावाने पांगावे असा सल्ला देऊन त्यांनी २० मिनिटांचा अवधी दिला. एव्हाना या अचानक घोषणेने जमाव आश्चर्यचकित झाला होता; पण पांगण्याची कुणाचीच तयारी नव्हती. उत्साहाने घोषणा देत सुमारे तीस–पस्तीस मिनिटे जमाव तसाच उभा होता. हुकुमाप्रमाणे जमाव पांगत नाही हे पाहाताच पोलिसांनी लाठीमार करून व नंतर अश्रुधूर सोडून त्याला पांगविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांचा हा नवा अवतार पाहून अचंब्यात पडलेल्या जमावाला पांगण्यासाठी किंवा पळापळीसाठी अवसर न देताच पोलिसांनी बंदुकीच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. त्यातच अश्रुधुराचे फुटके नळकांडे जमावाने पोलिसांवर फेकल्याने पोलीस चिडले. परिणामतः प्रत्येकी तीन गोळ्यांची एक अशा गोळीबाराच्या २८ फैरी झाडण्यात आल्या !

गोळीबार सुरू होताच जमाव सैरावैरा पळू लागला; पण उपलब्ध माहितीनुसार जमावाला पळण्यालाही पोलिसांनी एकही वाट शिल्लक ठेवली नव्हती. दुलियाजान पंपिंग स्टेशनच्या बरोबर समोर पोलीस स्टेशन आहे व मधोमध डांबरी रस्ता आहे. या रस्त्यावरच जमाव जमला होता. गोळीबाराच्या फैरी सुरू होण्यापूर्वीच या जमा-

वाला राखीव पोलिसांनी साखळी धरून घेरले होते व पळायला वावच ठेवला नव्हता. स्वाभाविकच तारेच्या कुंपणावर चढून, रक्तबंबाळ होऊन अनेक जण सरळ पंपिंग स्टेशनात घुसले. उरलेल्यांना मात्र गोळीबाराचे बळी व्हावे लागले !

या घटनेची जालियनवालाबाग हत्याकांडाशी अनेकांनी केलेली तुलना कितपत योग्य आहे याबाबत शंका असली तरी या गोळीबारात एकूण अडीचशेहून अधिक जखमी झाले तर सुमारे २० ते ३० व्यक्ती ठार झाल्या हे मात्र खरे आहे.

हे सारे रामायण घडले तेव्हा पंपिंग स्टेशनचे मुख्याधिकारी श्री. अजित शर्मा दुलियाजानला नव्हते व एक बंगाली अधिकारी श्री. रबी मित्रा त्यांचे काम पहात होते. गोळीबारात जखमी झालेल्यांना इस्पितळात ठेवण्यात आले होते व त्यांपैकी काहींची प्रकृती चिंताजनक आहे हे समजताच श्री. मित्रा यांनी इस्पितळात जखमींची विचारपूस करायला जायचे ठरविले. एव्हाना संतप्त जमाव मोठ्या संख्येने इस्पितळाबाहेर गोळा झाला होता. श्री. मित्रांची गाडी इस्पितळानजिक येताच काहींनी जमावाचा असा समज करून दिला की या श्री. मित्रांमुळेच गोळीबार झाला ! संतप्त जमावाला तेवढे पुरेसे होते ! त्यांनी श्री. मित्रा यांना घेरले व मरेपर्यंत बेदम मारले. एका हुशार व कर्तबगार अधिकाऱ्याचे आयुष्य असे अक्षरशः मातीमोल ठरले.

आसामातील आंदोलनात घडलेल्या या हिंसक प्रकारात हिंदू, मुस्लिम, असमिया, बंगाली, नेपाळी इ. सर्वांचीच साधारणपणे सारख्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली हा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. कुठे असमिया वरचढ ठरले तर कुठे बंगाल्यांनी असमियांचा वचपा काढला, एवढाच काय तो फरक. या सर्व आंदोलनात बंगाल्यांची अमानुष कत्तल झाली वगैरे प्रचार कलकत्त्यातील वर्तमानपत्रे करीत असली तरी असमियांचीही जीवित आणि वित्तहानी गंभीर स्वरूपाची आहे. नलबारी आणि आसपासच्या भागात आज दंगलीमुळे निर्वासित झालेली हजारो कुटुंबे निर्वासितांच्या छावण्यात आश्रय घेऊन आहेत. त्यांचे पुनर्वसन ही एक गुंतागुंतीची आणि अवघड समस्या आहे. परिस्थिती निवळली असली तरी छावण्या सोडायला लोक तयार नाहीत. विश्व हिंदु परिषद, भारत सेवा संघ, रोटरी क्लब इ. संस्थांकडून आणि राज्यशासनाकडूनही मुबलक मदत मिळत आहे. कदाचित त्यामुळेच रात्री घरी राहायला जायचे व दिवसा छावणीत तळ ठोकायचा ही प्रवृत्ती निर्वासितांमध्ये वाढत आहे.

आसामातील या आंदोलनात एवढे हिंसक प्रकार घडले असले तरी सर्वसाधारणतः हे आंदोलन शांततेनेच सुरू आहे असे म्हणावे लागेल. एवढ्या मोठ्या राज्यव्यापी आंदोलनात असे छोटेमोठे हिंसक प्रकार घडले तर आश्चर्याची गोष्ट नाही. 'इलस्ट्रेटेड विकली 'चे श्री. माधव कामत यांनी म्हटल्याप्रमाणे खुद्द महात्मा गांधींनासुद्धा हिंसक प्रकार टाळणे शक्य झाले नव्हते. तेव्हा या तुरळक हिंसक प्रकारांच्या आधारे सबंध आंदोलनालाच हिंसक ठरविणे न्यायसंगत ठरणार नाही. शिवाय हिंसक घटना सातत्याने घडलेल्या नाहीत. आंदोलन दडपण्याचे प्रयत्न जेव्हा जेव्हा झाले तेव्हाच-प्रामुख्याने जानेवारी महिन्यात-हे प्रकार घडले आहेत, हेही नमूद केले पाहिजे.

## विद्यार्थीनेते आणि पंतप्रधान

आसामातील तंग वातावरण निवळत असतानाच इंदिरा काँग्रेसतर्फे पंतप्रधानांनी आपले दोन विश्वासू सहकारी, 'आणीबाणी फेम ' यशपाल कपूर आणि शंकरदयाळ शर्मा यांना आसामात पाठवलं. या उभयतांनी आसामात अनेकांच्या भेटी घेतल्या, विद्यार्थीनेत्यांशीही त्यांनी चर्चा केली व प्रामुख्याने आसामात इंदिरा काँग्रेसचे सरकार आणण्याच्या दृष्टीने प्रयत्नही केले, परंतु त्यांना यश आलं नाही.

जनता पक्षानेही जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात श्री. अटलबिहारी वाजपेयी व रवींद्र वर्मा यांना पक्षाचे निरीक्षक म्हणून आसामात पाठविलं. या उभयतांनी गणसंग्राम परिषद व विद्यार्थीनेत्यांच्या भेटी घेतल्या, दंगलग्रस्त भागालाही भेट दिली. आपल्या अहवालात या उभयतांनी आसामातील आंदोलन विघटनवादी नसल्याचे स्पष्ट करून जनसामर्थ्याचा हा एक निग्रही पण शांततापूर्ण आविष्कार असल्याचं म्हटलं आहे. उशीरा म्हणजे फेब्रुवारीच्या मध्यास अर्स काँग्रेसनेही आपले दोन निरीक्षक आसामात पाठविले होते.

यशपाल कपूर व शंकरदयाळ शर्मा यांच्या अहवालावर विचार करून पंतप्रधान श्रीमती गांधींनी ऑल आसाम स्टुडंट्स युनियनच्या नेत्यांना ३ फेब्रुवारीस राजधानीत येऊन भेटण्याचे निमंत्रण दिले. स्टुडंट्स युनियन ही अखिल आसाम गणसंग्राम परिषदेच्या ११ घटकांपैकी एक असताना गणसंग्राम परिषदेला महत्त्व न देता विद्यार्थी संघटनेलाच पंतप्रधानांनी चर्चेसाठी पाचारण केले ही बाब महत्त्वाची आहे. राजकारणात अनेक पावसाळे घालविलेली मंडळी गणसंग्राम परिषदेच्या नेतेपदी आहेत, त्यांच्या तुलनेत स्टुडंट्स युनियनचे विद्यार्थी आपली विनंती सहज मान्य करतील असं वाटल्यावरून श्रीमती गांधींनी विद्यार्थीनेत्यांना निमंत्रण दिलं असावं. त्याचबरोबर विघटनवादी पूर्वांचलीय लोक परिषद व अन्य प्रादेशिक पक्षांना नगण्य लेखावं या उद्देशानंही श्रीमती गांधींनी अधिक विधायक भूमिका घेणाऱ्या विद्यार्थीनेत्यांना पाचारण केलं असण्याची शक्यता आहे.

गौहातीहून कलकत्तामार्गे नवी दिल्लीस या विद्यार्थ्यांना खास विमानाने आणण्यात आलं. सात विद्यार्थीनेत्यांच्या या शिष्टमंडळात विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष प्रफुल्लकुमार मोहंता, सरचिटणीस भृगुकुमार फुकन, कार्यालयसचिव अबू नासेर महंमद इत्यादींचा समावेश होता. शिवाय गौहाती विद्यापीठातील एक प्राध्यापक श्री. कुमुद-शर्मा दुभाशे म्हणून विद्यार्थ्यांबरोबर गेले होते. आमच्या भावना असमिया भाषेतच आम्ही अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतो व म्हणून आम्ही असमिया भाषेतच बोललो व एवढ्याचसाठी प्रा. शर्मांना आम्ही बरोबर नेलं होतं, असा खुलासा विद्यार्थी संघटनेच्या नेत्यांनी केला आहे. हिंदीचा द्वेष वगैरे यामागे नव्हता हेही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

केंद्र सरकारतर्फे नवी दिल्लीत या विद्यार्थ्यांची अलिशान हॉटेलातून सोय करण्यात आली होती. 'ऑर्गनायझर 'नं दिलेल्या वृत्तानुसार या विद्यार्थ्यांना वापरण्यासाठी काही फियाट गाड्याही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. शिवाय दिल्ली, आग्रा, जयपूर इ. भागात

पर्यटनाची व्यवस्थाही खास या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आली होती; परंतु प्रलोभनांना बळी न पडण्याच्या निर्धारानं आलेल्या विद्यार्थीनेत्यांनी ही सगळी ऐषारामी व्यवस्था नाकारून दिल्लीतील आसाम भवनात मुक्काम ठोकणंच पसंत केलं.

तीन फेब्रुवारीस पंतप्रधानांबरोबरच्या चर्चेची पहिली फेरी पार पडली. पंतप्रधानांच्या साउथ ब्लॉकमधील कार्यालयात झालेल्या या चर्चेच्या वेळी श्रीमती गांधींव्यतिरिक्त गृहमंत्री झैलसिंग, गृहखात्याचे दोन राज्यमंत्री, गृहसचिव, तसेच तेल व रसायन खात्याचे सचिव, यशपाल कपूर आणि शंकरदयाळ शर्मा प्रभृती हजर होते. चर्चा सुरू होण्यापूर्वीच विद्यार्थी नेत्यांनी त्यांच्या आंदोलनातील हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे स्तब्धता पाळण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार पंतप्रधानांसह सर्व नेत्यांनी श्रद्धांजली वाहण्यासाठी स्तब्धता पाळली.

चर्चेच्या आरंभीच पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी आसामातील विद्यार्थ्यांची 'विधायक दृष्टीचे राष्ट्रवादी विद्यार्थी' म्हणून प्रशंसा केली. आंदोलनातील हिंसाचार रोखण्यात यश मिळविल्याबद्दलही त्यांनी विद्यार्थीनेत्यांचं कौतुक केलं. 'तुमची असामान्य चळवळ पाहून तुम्ही कोणाकडून प्रेरणा घेतलीत असा प्रश्न माझ्या मनात येतो," असं पंतप्रधान म्हणाल्या तेव्हा विद्यार्थी नेत्यांनी नम्रपणे महात्मा गांधींच्या फोटोकडे निर्देश करून 'त्यांच्याकडूनच आम्ही प्रेरणा घेतली.' असं सांगितलं.

श्रीमती गांधींनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबद्दलही चर्चा केली. 'ऑईल पंपिंग स्टेशन्स व रिफायनरीवर निरोधने करून देशाचा तेलपुरवठा खंडित करण्यापेक्षा परकीय नागरिकांना भारतात वास्तव्य करू देणे व त्यांची हकालपट्टी न करणे अधिक अराष्ट्रीय आहे," असं सडेतोड उत्तर देऊन विद्यार्थी नेत्यांनी आपली बाजू मांडली.

सुमारे ९० मिनिटांच्या या मनमोकळ्या चर्चेमागे प्रामुख्याने विद्यार्थ्यांची बाजू ऐकून घेण्याचाच पंतप्रधानांचा उद्देश असावा. विद्यार्थ्यांनी श्रीमती गांधींना आसामला भेट देण्याचा आग्रह केला, त्यावर 'माझ्या येण्याने काही साध्य होईल असे मला वाटले तर मी जरूर येईन,' असे श्रीमती गांधींनी आश्वासन दिले. चर्चेअंती हीच चर्चा यशस्वी होण्यासाठी गृहमंत्री झैलसिंग गौहातीस भेट देऊन चर्चा पुढे चालू ठेवतील असं ठरविण्यात येऊन बैठक संपली.

### आठ मागण्या

या बैठकीत विद्यार्थ्यांनी सरकारपुढे एकूण आठ मागण्या मांडल्या, त्या खालीलप्रमाणे होत्या. १ : आसामातील परकीय नागरिक शोधून काढणे, त्यांची नावे मतदार याद्यातून काढणे व नंतर त्यांना स्वदेशी परत पाठविणे ही प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी. २ : परकियांची नावे मतदार याद्यांतून वगळल्याशिवाय कोणत्याही निवडणुका आसामात घेतल्या जाऊ नयेत. ३ : परकियांची घुसखोरी थांबविण्यासाठी राज्यसरकारच्या नियंत्रणाखाली घुसखोरी–विरोधी यंत्रणा निर्माण केली जावी. ४ : सीमावर्ती भाग पूर्णत: बंदिस्त करून घुसखोरी रोखण्यात यावी. ५ : आसामातील सर्व वैध मतदारांना फोटोसहित ओळखपत्रे देण्यात यावीत. ६ : असमियांचे स्वातंत्र्य आणि संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात येऊ नये यासाठी घटनात्मक तरतूद करण्यात यावी. ७ : अन्य राज्यसरकारांनी वितरित केलेली नागरिकत्वाची प्रमाणपत्रे रद्द करण्याचा अधिकार आसाम सरकारला द्यावा आणि ८ : बंगाल व त्रिपुरा या राज्यांना नागरिकत्वाची प्रमाणपत्रे वाटण्याचे अधिकार देण्यात येऊ नयेत, हे अधिकार केंद्र सरकारकडेच सुरक्षित ठेवावे.

यापैकी पहिल्या पाच मागण्या सरकारला मान्य असल्याचे गृह मंत्रालयाने घोषित केले आहे; मात्र विद्यार्थी नेते त्यावर समाधानी नाहीत.

### रोज पाच हजारांचा सत्याग्रह

श्रीमती गांधींशी चर्चा आटोपून परतल्यावरही विद्यार्थी नेत्यांनी ५ ते १३ फेब्रुवारी या काळात पुन्हा एकदा विशाल गण सत्याग्रहांचा आदेश देऊन आंदोलनाला गती दिली. एकट्या गौहातीत या दिवसात दररोज सरासरी पाच हजार नागरिक सत्याग्रह करून जेलमध्ये भरती झाले. पूर्वीप्रमाणेच शहरातील कॉटन कॉलेजच्या एका हॉलमधून या सर्व सत्याग्रहांच्या नियोजन व नियंत्रणाची व्यवस्था सुरू होती. बिल्ले लावू झाले की खास भाड्यानं आणलेल्या बस गाड्यांमधून सत्याग्रहींची ने-आण सुरू होती. रोज पाळीपाळीने शहरातला एकेक बाजार बंद राहून हरताळ पाळत होता. सत्याग्रहात एक दिवस राज्यातील सर्व सरकारी कर्मचारीही सामील झाले होते. हिंसेचं गालबोटही न लागता हे सत्याग्रह पार पडले.

सत्याग्रहाच्या जोडीला निरोधनेही सुरूच होती. गौहातीनजिक नारंगी पंपिंग स्टेशनवरची निरोधनं मी स्वत: पाहिली. शेकडो स्त्रिया, प्रामुख्यानं तरुणी आणि कॉलेजकन्यका रंगीबेरंगी शाली पांघरून नारे देत पंपिंगस्टेशनसमोरच्या फाटकाशी ठाण मांडून बसल्या होत्या. खुद्द पंपिंग स्टेशनातल्या कर्मचाऱ्यांचीही सहानुभूती आंदोलनाला लाभल्याने निरोधकांचा आतही शिरकाव झाला होता. पंपिंग व्यवस्थेतील सर्व मोक्याच्या जागी दोन दोन निरोधक तैनात केले गेले होते. अतिशय सावधपणे, शांततेने पण खंबीरपणे निरोधने सुरू होती.

राजधानीतून परत थेट गौहातीला येण्याऐवजी विद्यार्थी नेते शिवसागर या ठिकाणी थांबले होते. तिथेच त्यांनी केंद्रसरकारच्या चर्चेच्या तयारीला प्रतिसाद म्हणून काही काल सत्याग्रह तहकूब करण्याचा निर्णय घेतला. गणसंग्राम परिषदेला विश्वासात न घेता परस्परच हा निर्णय जाहीर केला गेल्याने परिषदेचे नेते काहीसे नाराज झाले; पण अखेर आंदोलनातील खरी ताकद विद्यार्थीच आहेत हे जाणून फार मनावर न घेता त्यांनीही या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. मात्र तेलशुद्धिकरण केंद्रे व पंपिंगस्टेशनवर निरोधने चालूच राहतील असाही निर्णय परिषद व विद्यार्थीसंघटनेच्या नेत्यांनी घेतला

फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात गृहमंत्री झैलसिंग यांनी गौहातीस भेट दिली. विद्यार्थी संघटनेच्या नेत्यांशी त्यांनी दोन वेळा चर्चा केली. गणसंग्राम परिषदेच्या नेत्यांशीही त्यांनी बोलणी केली. विद्यार्थ्यांनी दिल्लीत पंतप्रधानांसमोर मांडलेल्या आठ मागण्यांपैकी शेवटच्या तीन मागण्या व विदेशी नागरिक ठरविताना आधारभूत मानावयाचे जनगणना वर्ष हे दोन वादग्रस्त मुद्दे होते. या मुद्द्यावर विद्यार्थीसंघटना व गणसंग्राम परिषदेशी झालेल्या चर्चेतून तडजोड

काढण्याचा प्रयत्न करणे हा गृहमंत्र्यांच्या आसाम–भेटीचा हेतू होता. वस्तुतः या दोन संघटनांनी तडजोडीला नकार दिल्यानंतर अन्य कोणाशीही चर्चेची आवश्यकता नव्हती. परंतु झैलसिंग यांनी, राजकीय पक्षांचा या आंदोलनावर यत्किंचितही प्रभाव नसताना, सर्व राजकीय पक्षांची एक बैठक बोलावून, त्यात ठरल्याप्रमाणे १९७१ हे आधारवर्ष मानण्यास सर्व राजकीय पक्ष तयार असल्याची घोषणाही करून टाकली. इथे राजकीय पक्षांनी कोणते आधारवर्ष मानण्यास मान्यता दिली याला महत्त्व नाही. कारण त्यांच्या अमान्यतेवर आंदोलनाचे भवितव्य अजिबातच अवलंबून नाही. त्यातही जनता पक्षाला ही तडजोड मान्य नसल्याचे त्याच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले होते; पण त्याचा सरकारी प्रसिद्धिपत्रकात उल्लेख नव्हता. थोडक्यात म्हणजे बाकी कोणी नाही तरी निष्प्रभ राजकीय पक्षांनी आपले ऐकले याच्या फुकटच्या समाधानात झैलसिंगमहाशय राजधानीत परतले.

आसामातील आंदोलनाचा फेब्रुवारीअखेरपर्यंतचा हा तपशीलवार इतिहास आहे. या सर्व आंदोलनात निष्प्रभ असलेले परंतु तरीही राष्ट्रीय संदर्भात महत्त्वाचे असे आसामातील राजकीय पक्ष व त्यांच्या आंदोलनाबाबतच्या भूमिका, काही स्वयंसेवी संघटनांचा आंदोलनातील सहभाग, काचार जिल्हा आणि 'आमरा बंगाली' चळवळीसह या आंदोलनाबाबतचा बंगाली भाषिकांचा दृष्टिकोन इ. महत्त्वाचे मुद्दे अद्याप राहिले आहेत, त्याबाबतचं विवेचन पुढील लेखांकात. (क्रमशः)

---

पुस्तके । फिनिक्स निवड

# The West End Horror

A posthumous memoir of John H. Watson, M. D.
Edited by : Nicholas Meyer,
Pages 160. 80 p.

एखाद्या कादंबरीत डॉ. शिरवैरकर, मार्फतीया, बगडिया, लुकतुके व धनंजय, छोटू किंवा काला पहाड यांची भेट घडली असे तुम्ही वाचले तर तुम्हाला काय वाटेल ? सध्या इंग्रजी वाङमयात एक नवा पायंडा म्हणजे खऱ्याखुऱ्या व्यक्ती व काल्पनिक पात्रे यांची सरमिसळ करून कादंबरी रंगवणे. जेव्हा शेरलॉक होम्सना कोकेनचे व्यसन जडते तेव्हा ते सीगमंड फ्रॉइडकडे मनोविश्लेषणासाठी व्हिएन्ना येथे जातात ! या पुस्तकाची ओळख मी माणूसच्या ३१ जुलै १९७६ च्या अंकात करून दिलेली आहे.

इंग्रजीमध्ये आणखीन एक डॉक्टॉरॉ या लेखकाचे Ragtime नावाचे पुस्तक आहे. त्यात अशीच खऱ्याखुऱ्या व्यक्ती व काल्पनिक पात्रे यांची जुळवाजुळव आहे. Any takers in Marathi ?

साहित्यक्षेत्रातील प्रचलित संकेतानुसार एखाद्या प्रख्यात साहित्यिकाचा मृत्यू त्या साहित्यिकाने निर्मिलेल्या पात्राचेही आयुष्य संपुष्टात आणतो आणि जेव्हा असे होते तेव्हा वाचक एकदम जागा होतो व त्या पात्राबद्दलचे त्याचे प्रेम शंभर पटींनी वाढते. प्रत्येक नियमाला अपवाद असतात या न्यायानुसार वर उल्लेख केलेल्या संकेतालाही काही अपवाद आहेत. इयान फ्लेमिंग यांच्या मृत्यूनंतर त्यांनी निर्मिलेल्या जेम्स बाँड या पात्राला नायक मानून त्यावर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या व चित्रपटही निर्माण करण्यात आले. सर आर्थर डॉइल या नेत्रविशारदाने आपल्या अफाट कल्पनाशक्तीच्या आधाराने रंगविलेल्या शेरलॉक होम्स या पात्रालाही मूळ लेखकाच्या मृत्यूनंतर निकोलस मेयर या लेखकाने पुनर्जन्म दिला आहे. आपल्या 'सेव्हन परसेंट सोल्यूशन' या कादंबरीत होम्सला पुनर्जन्म दिल्यानंतर होम्सचा आणखी एक पराक्रम आपल्या 'दी वेस्ट एण्ड हॉरर' या पुस्तकात लेखकाने रंगवला आहे.

या पुस्तकाचे वर्णन 'सेव्हन परसेंट सोल्यूशन'ची Sequel असे करण्यात आले आहे. त्यानुसार 'सेव्हन परसेंट सोल्यूशन'च्या शेवटाला अनुसरून प्रस्तुत पुस्तकाची सुरुवात असायला हवी होती; पण सेव्हन परसेंट सोल्यूशनचा मागमूसही येथे लागत नाही. आपल्या क्षेत्रात देदीप्यमान कीर्ति मिळवलेल्या व्यक्तीचे कादंबऱ्यातील चित्रण नेहमी चांगले उतरतेच असे नाही; पण मेयरने आपल्या आधीच्या पुस्तकात मनोविश्लेषणाचा आद्यजनक सीगमंड फ्रॉइडचे चित्रण चांगल्या प्रकारे केले होते. या पुस्तकातही जॉर्ज बर्नार्ड शॉ, ऑस्कर वाइल्ड या लेखकांची व्यक्तिचित्रे रेखाटण्यात आली आहेत.

होम्स व शॉ हे एकमेकांचे खास मित्र होते असे पुस्तकात दाखविण्यात आले आहे. जोनाथन मॅकार्थी या नाट्यसमीक्षकाचा खून होतो व त्याचा खून कोणी केला हे शोधून काढण्याकरिता शॉमहाशय होम्सची मदत मागतात, ( विनामूल्य ) ! होम्स, शॉ व वॅटसन गुन्ह्याच्या स्थळी येऊन पोहोचतात. आपल्या नेहमीच्या पद्धतीने म्हणजेच रांगत रांगत, सुस्कारे सोडत, शीळ घालत होम्स जागेची तपासणी करतात व नेहमीप्रमाणेच खुन्याचे वर्णन करतात. गुन्हा झालेल्या ठिकाणी एकच महत्त्वाचा दुवा मिळतो तो म्हणजे मृतव्यक्तीने मृत्यूपूर्वी रक्तस्राव होत असतांनाही शेक्सपिअरच्या रोमिओ अँड ज्युलिएट या नाटकाची प्रत एका विशिष्ट पानावर उघडी ठेवलेली असते.

तपास करताना होम्सची ऑस्कर वाइल्डशीही गाठ पडते. त्याला बघून Outright, downright, nauseating perversion my dear Watson' असे त्याच्या समलिंग संभोगवासना बघून होम्स कसे म्हणत नाही याचेच आश्चर्य वाटते ! वाइल्डकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे होम्स त्या वेळच्या प्रसिद्ध सॅव्हॉय नाटककंपनीत जातात. होम्स तिथे गेल्यानंतर आणखी एक हत्या तिथे होते. या वेळी जेसी रटलँड नावाची नटी अपराधी व्यक्तीची शिकार असते. सर हेन्री आर्यव्हिंग व सर ऑथर सलीव्हन या नाट्यक्षेत्रातील प्रसिद्ध असणाऱ्या गृहस्थांचीही होम्सला मदत होते. ( सर हेन्री आर्यविंग हे त्या काळातील एक अत्यंत नावाजलेले नट होते तर सर ऑर्थर सलीव्हन हे प्रख्यात संगीतकार होते. ) गुन्ह्याचा तपास करताना ही जोडगोळी ( होम्स-वॅटसन ) ड्रॅकुला

कथांची लेखक म्हणून नंतर प्रसिद्धिझोतात येणाऱ्या ब्राम स्टोकरच्या घरीही एक चोरटी भेट देते.

यानंतर कथानकाला एक वेगळेच वळण देण्यात आले आहे. ते म्हणजे ज्या पोलिस-सर्जनकडे आधी हत्या झाली त्यांचे (मॅकार्थी व रटलँड) मृतदेह शवविच्छेदनासाठी सुपूर्त केलेले असतात. तो पोलिससर्जनच अचानक या दोन्ही मृतदेहांसकट बेपत्ता झालेला असतो.

दरम्यान एका पार्शी गृहस्थाला पोलिसांनी खुनाच्या आरोपावरून अटक केलेली असते. सर्व परिस्थितिजन्य पुरावा या पार्शी माणसाच्या विरुद्ध असतो; पण तो अपराधी नाही याची होम्सला खात्री पटलेली असते व तो खऱ्या अपराधी व्यक्तीला शोधून काढतो.

दुसऱ्या एका प्रसंगात, आपल्या आयरिश वंशावळीचा अभिमान असलेला शॉ जेव्हा प्रतिपादन करतात की इंग्रजी भाषेतील सर्व थोर नाटककार आयरिश होते तेव्हा डॉ. वॅटसन हळूच शेक्सपिअरचे नाव सुचवतात. शेक्सपिअरचे नाव ऐकताच शॉमहाशय भयंकर चवताळतात व शेक्सपिअरवर यथेच्छ तोंडसुख घेतात. त्या वेळी त्यांच्या तोंडी घातलेली वाक्ये मुळातूनच वाचण्यासारखी आहेत. पुस्तकाच्या अखेरीस दाखविलेला शॉ व होम्स यांच्यातील विनोद आमच्या माहितीप्रमाणे प्रत्यक्षात शॉ व चर्चिल यांच्यात झाला होता. तिकिटांचा.

वाइल्डचे चित्रण करताना तो प्रसिद्ध लेखक होता यापेक्षा तो एक Homosexual होता हेच ठसविण्याचा प्रयत्न केला गेला आहे असे वाटते. मार्क्विस ऑफ क्वीनसबरीच्या मुलाशी असलेल्या संबंधामुळे त्याला दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा २५ मे १८९५ रोजी सुनावली जाते ही माहिती आपल्या एका तळटीपेमध्ये मेयरने पुरवली आहे. मार्क्विस ऑफ क्वीन्सबरी वाइल्डला पाठविलेल्या आपल्या कार्डावर "To Oscar Wilde posing as somdomite" असे लिहितो. (वाइल्ड त्यावर अब्रुनुकसानीचा खटला भरतो; परंतु वाइल्ड हा स्वतः समलिंगी संभोगाच्या आहारी गेला असल्यामुळे मार्क्विसने लिहिलेल्या वाक्यामुळे वाइल्डच्या अब्रुनुकसानीचा प्रश्नच उद्‌भवत नाही व वाइल्डचा खटला त्यावरच उलटतो.) यात वाइल्डला स्वतःला समलिंगी संभोगक म्हणून संबोधित केले ह्याचा राग तर येतोच; पण त्याशिवाय sodomite या शब्दाचे स्पेलिंग चुकीचे लिहिले गेले याचा राग येतो!

ड्रॅक्युला कथांचा लेखक स्टोकर याचा उपयोगही त्याच्यावर संशय केंद्रित व्हावा याच हेतूने केला असावा असे वाटते.

खुद्द होम्स व वॅटसन या जोडगोळीचे वर्णन कॉनन डॉइलच्या साच्यातून काढल्याइतके सरस वठले आहे. होम्सने वेषांतर करून वॅटसनला फसविणे, आपल्या नेहमीच्याच पद्धतीप्रमाणे बारक्याशा दुव्यावरून खुन्याचे अचूक वर्णन करणे इत्यादी गोष्टी चपखलपणे कथानकात बसविल्या आहेत. भाषाशैली मात्र कॉनन डॉइलपेक्षा थोडीशी बोजड वाटते. कदाचित आभास निर्माण करायच्या उत्साहात हे घडले असावे असे वाटते. उदाहरणार्थ "My first impression, upon entering the room, was that I had journeyed backwards in Mr. Wells' Time Machine & stumbled upon a Roman saturnalia of some sort, peopled by satyrs, Pan-ilike cherubs and elves. [पृष्ठ क्रमांक ५३]

एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे की पुस्तक लिहिण्यासाठी लेखकाने डॉइल यांच्या शैलीचा कसून अभ्यास केला आहे हे लगेच जाणवते. त्या काळची वातावरणनिर्मितीही चांगली झाली आहे. जाता-जाता कॉन्टॅक्ट लेन्सेसचा शोध शंभर वर्षांपूर्वी एका जर्मन शास्त्रज्ञाने लावला होता, ही आश्चर्यकारक माहिती देताना मूळ लेखक सर आर्थर कॉनन डॉइल यांना, त्यांचे लक्ष आपल्या नेत्रविशारदाच्या व्यवसायापेक्षा साहित्यक्षेत्राकडेच जास्त होते असा चिमटाही काढला आहे.

सबंध पुस्तकात खटकणारी एकच गोष्ट आहे; पण त्या एकाच गोष्टीमुळे लेखकाने इतर बाबतीत जेवढे संशोधन केले आहे तेवढे भारतीय धर्म व नावांबद्दल केले आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत पुस्तकातील पार्शी गृहस्थाचे नाव चकचकीत 'अचमेतसिंग' असे लेखकाने ठेवले आहे.

एकंदरीत होम्सच्या कथांवर जगणाऱ्या प्रेक्षकांना मेयरने एक उत्तम भेट दिली आहे. जरी पहिल्या पुस्तकाइतकं हे पुस्तक सरस उतरलं नसलं तरी प्रत्येक होम्स व डॉइल भक्ताने हे पुस्तक वाचण्याजोगे आहे यात काही शंकाच नाही.

पात्रांची गर्दी मात्र पुष्कळ झाली आहे. एखाद्या लहान कॅनव्हासवर मोठे चित्र काढण्याचा प्रयत्न कुणी तरी केला आहे असे हे पुस्तक वाचून वाटते.

आता शेरलॉक होम्सच्या नवीन कादंबऱ्या बाजारात यायला लागल्या आहेत हे आम्ही टाहो फोडून सांगतो!

—रवींद्र बिवलकर
—जे. एन्. पोंडा


**New Titles Received**

| | | |
|---|---|---|
| 1. | Chesapeake – (The magnificent story of chesapeake bay–its history, its people its wildlife–Bestseller) James A. Michener. | £ 2·23 |
| 2. | Montgomery Clift – (Biography) – Patricia Besworth. | £ 1·25 |
| 3. | Sophia–Leving and Loving – (Biography) – A. E. Hotchner | $ 2·75 |
| 4. | Prophecy – (Horror story) – David Seltzer | $ 2·75 |
| 5. | Airport 80 – the Concorde – (Picture story)–Kerry Stewart | 90 p. |
| | **मराठी** | रु. |
| १. | आठवणींचे पक्षी – (दलित साहित्य) – प्र. ई. सोनकांबळे | १०/– |
| २. | झोपाळा – (कथासंग्रह) व. पु. काळे | १६/– |
| ३. | रंगपंचमी – (कथासंग्रह) व. पु. काळे | १६/– |
| ४. | फूटपाथ नं. १ – (कादंबरी) शंकरराव खरात | २०/– |
| ५. | मध्यरात्रीचे पडघम (गूढकथा) – रत्नाकर मतकरी | २०/– |

* Watching TV will make you a conformist ! But book reading will make you an individualist !!

**फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# रंगभूमी

## रथचक्र

### दोन प्रतिक्रिया

## प्रेक्षकांना भिडणारी नवी आई

विनया खडपेकर

श्री. ना. पेंडसे यांनी लिहिलेले 'रथचक्र' पाहिले आणि किती तरी दिवसांनी एक चांगल्यापैकी गंभीर नाटक पाहायला मिळाले असे वाटले. काही महिन्यांपूर्वी पाहिलेले 'मंतरलेली चैत्रवेल' चांगल्यापैकी व्यक्तिचित्रणामुळे समाधान देणारे होते. तरीही त्यातील रहस्यमय लीलाबाई आणि चारूचा विचित्र आजार हे प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्यासाठी वापरलेले कृत्रिम घटक आहेत असे जाणवत होते. 'रथचक्र'मध्ये असे कृत्रिम तंत्र कोणतेही नाही. तरी प्रेक्षक नाटकाबरोबर वाहून जाऊ शकतात हे या नाटकाचे श्रेष्ठत्व आहे.

'रथचक्र' ही एका आईची कथा आहे. दुर्दैवी आईची कथा. तसा आईच्या कथांना किंबहुना दुर्दैवी आईच्या कथांना मराठीत तोटा नाही. 'शामची आई'पासून आम्हाला त्यांचा परिचय आहे; पण 'रथचक्र'मधील ही आई 'प्रेममूर्ती'च्या साच्यातील नाही. परागंदा पती, न विचारणारी मुले एवढेच तिचे दुर्दैव नाही. तिचा पतीविषयीचा तिटकारा, तिचे मुलांविषयीचे प्रेम कोणी समजूच शकत नाही हे तिचे दुर्दैव आहे. ही आई तिच्या अशा दुर्दैवाने प्रेक्षकांना जाऊन भिडते.

कोकणच्या खेडेगावातल्या एका एकत्र कुटुंबाचा घटक 'ती.' तिला दोन मुले. नवरा संन्यास घेऊन परागंदा. घरात दीर-जावांचे राज्य. तिच्या नवऱ्याचा शोध लावण्यासाठी दिरांचे एकसारखे प्रयत्न. तिला वाटते मुलांना जन्म देऊन जबाबदारी टाळणारा तो बेजबाबदार पुरुष आहे. ती स्पष्ट बोलून दाखवीत नाही; पण त्याचा तिरस्कार करते. म्हणून ते घर तिचा रागराग करते; पण हट्टीपणे, कणखरपणे 'ती' आपल्या मार्गाने पुढे जाते. शिक्षणासाठी मुलांना घेऊन तालुक्याला जाते. दळणकांडणाची कामे करते; पण मोठा मुलगा काहीच शिकणे न जमून परत गावी येतो. धाकटा तिचा प्रथमपासूनच रागरागच करीत असतो. तिच्याशी धड एक शब्दही बोलत नाही; पण तो शिकतो आहे एवढ्यावरच समाधान मानून ती कष्ट उपशीत राहते. तो खाणावळवाल्या कृष्णाबाईच्या जाळ्यात सापडतो; पण सावध होऊन मुंबईला पळून जातो. तिला परत गावी त्या कुटुंबात यावे लागते. पळून गेलेला धाकटा मुलगा परीक्षेत उत्तम यश मिळवतो; पण आईच्या कष्टाची त्याला जाणीवच नाही. तिला अगदी तोडून टाकणारे पत्र तो लिहितो. नवरा मौनीबुवा म्हणून परत येतो. त्याला त्राग्याने जाब विचारायला ती जाते; पण ते घडू शकत नाही. स्वतःला कर्जमुक्त करण्यासाठी तिचे दीर तिच्या मोठ्या मुलाचे लग्न सावकाराच्या फेंगड्या मुलीशी ठरवतात. ते ती रोखू शकत नाही. शेवटी ती आत्महत्या करते.

असे हे थोडक्यात कथानक. ते एकंदरीत निर्दोष आहे. केवळ एक प्रसंग किंचित खटकतो. दीर सलगी करू लागतो तेव्हा हातात विळा घेऊन ती त्याला परतवते. हा प्रसंग तिला 'हिरॉइन' बनविणारा वाटतो. नायिकेवर काय काय प्रसंग गुदरतात आणि ती कशी धैर्याने तोंड देते ते येथे सांकेतिकपणे दाखविले आहे असे वाटते.

वास्तव कुटुंबचित्र आणि सूक्ष्म व्यक्तिरेखा ही या नाटकाची वैशिष्ट्ये आहेत. निरनिराळ्या [प्रसंगांत – पत्री मोजण्याचा साधा प्रसंग किंवा तिचा नवरा मौनीबुवा म्हणून परत येतो ती महत्त्वाचा प्रसंग. प्रत्येक प्रसंगात निरनिराळ्या व्यक्तींची निरनिराळी वैशिष्ट्ये दिसतात आणि 'ति'ची कथा पुढे जाते. एकाच व्यक्तीमध्ये अनेक विरोधी सूर दिसतात. तिचा धाकटा मुलगा घुम्या आहे. तिच्याशी बोलतो तेव्हा तोडूनच बोलतो. वडिलांच्या फोटोच्या पूजेचे नाटक करतेस म्हणतो. तरीही शेवटी तिच्या जेवणाची सोय व्हावी म्हणूनच कृष्णाबाईकडची नोकरी स्वीकारतो. लखनौवाला दीर भावांची लुच्चेगिरी आणि आळशीपणा ओळखून आहे. त्यांना तो तिखट जिभेने बोलतो; पण पुनःपुन्हा पैसे देतोच. असे जरी असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तुकडे पडले नाहीत. त्यांचे परस्परविरोधी वागणे म्हणजे एकदम 'ट्रान्सफर सीन' असा प्रकार या नाटकात घडत नाही. याचे कारण त्या त्या व्यक्तिमत्त्वाचा सूर लेखकाला अचूक गवसला आहे. हल्ली पुष्कळदा असे दिसते की, माणसातल्या विसंगती लेखकाला बुद्धीच्या पातळीवर कळतात आणि तो तिचे 'निवेदन' साहित्यात करतो. अशा केवळ निवेदनाने व्यक्तिमत्त्व साकार होऊ शकत नाही. माणसाच्या वागण्याची कारणे लेखकाला अचूक जाणवली आणि प्रतिभेने तिचा आविष्कार झाला की ते व्यक्तिमत्त्व जिवंत होते. लखनौवाल्याचे त्या मातीशी असलेले नाते नाटकात चित्रित होते. त्यामुळे हिशोबी वृत्ती असून, भावांवर प्रेम नसून त्याचे कुटुंबासाठी सतत झीज सोसणे सुसंगत वाटते. या वैशिष्ट्यांमुळेच प्रेक्षक नाटकात गुंतून पडतात.

'रथचक्र' या आपल्या कादंबरीचे नाटकात रूपांतर करताना श्री. ना. पेंडसे यांनी काही बदल केले आहेत. नाटकात एका दिराची पत्नी वारली असल्याचा उल्लेख आहे. कादंबरीत कोणत्याही दिराची पत्नी वारलेली नाही. नाटकात दीर तिच्याशी सलगी करतो असे दाखविले आहे, तर काद-

बरीत 'ती' आपल्यावर असला वाईट प्रसंग आला नाही, कुणी घाणेरडा आरोप केला नाही असे आवर्जून सांगते. कादंबरीत यामुळेच एकत्र कुटुंबाची संस्कारबद्धता अधिक तीव्रतेने जाणवते. कादंबरीत तिला दोन मुले आणि दोन मुलीही आहेत. मुली नाटकात वगळल्या आहेत.त्यामुळे एक आटोपशीरपणा आला आहे. नाटकात तिचा मोठा मुलगा मंद बुद्धीचा, भावडा, प्रेमळ, नेहमी आईची कड घेणारा दाखविला आहे. कादंबरीत मोठा मुलगाही तिच्याकडे दुर्लक्ष करणारा, तिच्याशी बेपर्वाईने वागणारा, मतलबी दाखविला आहे. तिचे एकाकीपण त्यामुळेच कादंबरीत फारच तीव्रतेने जाणवते. नाटक आणि कादंबरी यांची तुलना करता कादंबरी उजवी वाटते. नाटक हे 'ती' केंद्रबिंदू असलेले एकपदरी कथानक आहे, तर कादंबरीला 'ती' केंद्र असलेले अनेक पदरी कथानक आहे. कोकणच्या निसर्गाचे स्थान कादंबरीत अविभाज्य असल्याचे क्षणाक्षणाला जाणवते. नाटकात घराची पार्श्वभूमी ठीक आहे; पण तिला महत्त्वाचे स्थान नाही. छोटी कुशी, काकांचे गृहजीवन, तालुक्याला गेल्यावर मास्तरीणबाई, वाणीण, गळचात तुळशीची माळ घातलेली बाई अशा अनेक लहानसहान व्यक्तिरेखा कादंबरीत येतात आणि 'ती' फक्त आई म्हणून न दिसता एक व्यक्ती म्हणून ठसठशीतपणे उभी राहते. कादंबरीची शैली ही कादंबरीची कथा, वातावरण यांच्याशी अगदी मिळून गेली आहे मोठचा मुलाने साले म्हणून तिला शिवी दिल्यावर 'डोक्यात मुसळ बसावं तसं तिला झालं,' ही उपमा कोकणच्या वातावरणाला अगदी समर्पक आहे; परंतु नाटकात संवादाच्या शैलीचा तोल काही ठिकाणी ढळला आहे. 'माझ्या शरीराच्या पेशी बंड करतील' किंवा 'माझ्या हातात खड्ग असेल मातेचं' ही वाक्ये अल्पशिक्षित कोकणी स्त्रीच्या जिभेला मुळीच शोभत नाहीत. दीर जेव्हा तिला सलगीने म्हणतो, 'माझीही पत्नी वारलेली, तुझा काय कोंडमारा होतो ते मला कळते' वगैरे. ते सगळे बोलणे आधुनिक सुशिक्षित शहरी माणसाचे वाटते. कोकणी माणसाला साजेसे नाही.

नाटकाचा प्रयोग उत्तम होतो. लेखकाने जे सांगितले आहे ते दिग्दर्शक कमलाकर सारंग आणि कलाकार यांनी उचित भानाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचविले आहे. रोहिणी हट्टंगडी यांनी या नाटकात दोन भूमिका केल्या आहेत. दोन्ही भूमिका परस्पर विरोधी आहेत. एक भूमिका कर्मठ, सात्त्विक, सोवळी अशी 'थोरली'ची आणि दुसरी भूमिका व्यभिचारिणी खाणावळवालीबाई कृष्णाबाई हिची. दोन्ही भूमिका त्यांनी सारख्याच तन्मयतेने केल्या आहेत. सोवळचा 'थोरली'वर विजया मेहतांचा प्रभाव वाटतो. पण प्रभावच! रोहिणी हट्टंगडी विजया मेहता यांची नक्कल करीत नाहीत. दोन्हीत मात्र मला आवडली त्यांची कृष्णाबाईच! रथचक्र कादंबरी वाचताना कृष्णाबाईचे जे रूप डोळ्यांसमोर दिसते, जो आवाज ऐकू येतो अगदी त्याचाच आविष्कार रोहिणी हट्टंगडी यांनी रंगमंचावर केला आहे. कृष्णाबाईचा तो आरडाओरडा, लहरीपणा, आक्रमकपणा! जशी काही कादंबरीतून उठली आणि रंगमंचावर येऊन उभी राहिली. इतर कलाकारांनी आपापल्या भूमिका अगदी समरसून केल्या. 'लखनौवाला' सोडल्यास इतर पुरुषपात्रांना या नाटकात वाव कमी आहे. 'मोठा (मधु वगळ) मधला (बाळ कर्वे) मौनीबुवा (कमलाकर सारंग) विजय कदम (पुंध्या)यांनी आपल्या अभिनयांनी नाटकाला उठाव आणला आहे. विराज चिटणीस (गुंड्या) राजा नाईक(काका), सतेज पोटे (हेडमास्तर) यांनी आपल्या भूमिका करताना नाटकाला उणेपणा येऊ दिला नाही. धनंजय भावे यांचा 'लखनौवाला' रोहिणी हट्टंगडी यांच्या कृष्णाबाईइतकाच प्रभावी आहे. तारा पाटकर (मोठी) यांनी आपल्या थोडचाशा भूमिकेत विशेष चमक दाखविली. लालन सारंग(ती) यांचा आवाज कोमल येतो. शब्दउच्चारण्याची पद्धतही आधुनिक शहरी 'स्त्री'ची वाटते. ती त्यांच्या भूमिकेशी विसंगत आहे. भडकलेली, चिडलेली 'ती' त्या सहजपणे उभी करतात तितके तिच्या अगतिक बाजू रंगविणे त्यांना जमले नाही.

एकत्र कुटुंबाचे मोठे घर, तालुक्यातले भाडचाचे लहानसे घर, कृष्णाबाईची खाणावळ येथील वातावरणनिर्मिती योग्य आहे. कृष्णाबाई आणि धाकटा मुलगा यांच्या एकांताचा प्रसंग कोणताही अतिरेकीपणा न करता योग्य प्रकारे आला आहे. आजच्या नाटकाची प्रवृत्ती पाहता त्याचे भांडवल बनविले नाही हे विशेषच—दादा—ताई मंडळी नसली तरी 'अभिषेक' निर्मित हे नाटक खऱ्याखुऱ्या अर्थाने कौटुंबिक आहे. ※

---

# ते खुडकणं, तो जळफळाट !

भाऊ पाध्ये

---

एखाद्या साहित्यकृतीचे-पहिले सोपस्कार म्हणजे प्रकाशनसमारंभ, टीकाकारांकडून कौतुक, शिवाय सरकारी, अकादमीचे पारितोषिक वगैरे झाल्यानंतर, ते वाचनालयाच्या फडताळात पडून राहण्यापलीकडे काही तरी व्हायला हवे, असे कुणाही लेखकाला वाटते. उदाहरणार्थ त्याचे नाटक केले जावे, त्यावर चित्रपट निघावा....

श्री. ना. पेंडसे यांच्या अकादमी पारितोषिक विजेत्या 'रथचक्र'चे नाटचरूपांतर पेश करून 'अभिषेक' या नाटचसंस्थेचे कमलाकर सारंग यांनी प्रस्तुत कादंबरीला वाचनालयाच्या फडताळाबाहेर आणले आहे. हे उत्तमच झाले म्हणावे. त्यामुळे अनेक कादंबऱ्या वाचनालयाच्या फडताळातून बाहेर पडण्यासाठी जागच्या जागी उडचा मारतील.

एक अवघा रंगमंच व्यापून अंतर्भागात उरलेले घर. त्याच्या अंगणात नवरा सोडून गेल्यामुळे अ-नाथ झालेली बाई, घरातला एक ज्येष्ठ सल्लामसलतगार काका, यांच्यामध्ये काही सल्लामसलत चाललेली आणि ती खिडकीमधून जाऊबाई गुपचूप ऐकतात. यानंतर या घरात चिक्कार भानगडी रंगणार हे कळून चुकते. पात्रेही तशीच आहेत. गुण्यागोविंदाने एकटं रहाण्याचे किंवा न-रहाण्याचे सोंग करणारी. अ-नाथ बाईचा अभ्यासात हुशार पण स्वभावाने खडूस छोकरा, दुसरा कामातून गेलेला मुलगा. बायकोला पोचवलेला एक दीर, तर दुसरा गावातील बायकांच्या निऱ्यांपर्यंत पोहोचणारा. भांडाभांडी चिक्कार. एक शांतता प्रस्थापित करणारी म्हातारी. कुठल्याही घरात भांडाभांडी झाली की पब्लिक जमते. तशीच नाटकाला आलेली पब्लिक ही भांडाभांडी रंगून पाहू लागते. एक 'सॅडिस्टिक व्हायरिझम' म्हणावा प्रेक्षकांचा.

यामध्ये अ–नाथ बायको सतत अपमानाचे शल्य घेऊन खुडकणारी. तालुक्याच्या गावी जाण्याचे बेत बांधू लागते. तिचा नवरा मौनीबाबा होऊन गेलेला. तेव्हा तिचे भवितव्य ठरवणार घरातली वडीलधारी मंडळी. यात ज्यांच्या हातात तिजोरीच्या किल्ल्या सापडतील तो लांडचालबाड्या करायच्या का सोडेल? म्हणून बाईला परस्वाधीन वाटत असते.कुठे काही घराबाहेर बोललं तर चुगली खाल्ली म्हणून सर्वांची माफी मागण्याचा प्रसंगही वारंवार येतो आणि वारंवार माफी मागूनही चांगलं कोडगं व्हावं तर बाई मनाला लावून जळफळते. या जळफळाटामुळे सारे नाटक व्यापून जाते. या जळफळाटातून अनेक वेळा बायका शूर कृत्य करावयास निघतात. (उदा. आणीबाणीला विरोध –ही अलीकडची घटना.)ही अ-नाथ बाई स्वराज्य स्थापन करण्याचा जिजामातेला ध्यास लागावा त्याप्रमाणे ध्यास घेऊन आपली कुंड्या आणि गुंड्या ही दोन मुले घेऊन तालुक्याच्या गावी जाण्याचा आपला बेत अखेर तडीला नेते.

तर तालुक्याचे गाव आणि खेडे यात फरक असतोच. ‘ तालुक्याच्या गावी येऊन नोकरीधंदा करून पोटापुरते मिळवायचे म्हटले तर थोडेफार कसब आणि श्रम करण्याची कुवत हवीच. ही अनाथ बाई या दृष्टीने भलतीच इन्कॉम्पिटंट असते. म्हणजे एक खाणावळवाली तिच्या नवऱ्याच्या पुण्याईमुळे तिला निवडणेटिपण्याचे काम देते. तेही तिला जमत नाही. या कोकणस्थ बाईला मेतकूटही करता येत नाही. सहाजिकच खाणावळवालीचा पेशन्स संपतो आणि ती काम बंद करू पाहते. मग पाया पडणे, लाचारी. खेड्यात यापेक्षा वाईट काय होतं? आपले राज्य निर्माण करायचे म्हणजे आपल्या मुलांना तलवार चालवता आली पाहिजे, दांडपट्टा फिरवता आला पाहिजे. तर या अ–नाथ बाईची मुले या दृष्टीने मुळीच तयार नसतात. मोठा मुलगा त्या भोकं पाडणं आणि टाके घालणं असल्या कामाला बोअर होतो आणि आपल्या नाटकवेड्या काकाबरोबर खेड्यात जातो. तिकडे खेड्यात आपलं लग्नबिग्न तरी होईल. इकडे आईच्या मागे जिवाचा ताप करून काय होणार आहे, हे त्याला बहुतेक पटलं असावं. दुसरा मुलगा खाणावळवालीच्या प्रकरणात घर सोडून जातो. मग बाई पुन्हा खेड्याकडे. आपला मुलगा खाणावळवालीमुळे बिघडला म्हणून बाईने जळफळाट केलेला असतोच. चुकीचाच असतो तो.

मजा अशी की तो जळफळाट ती आपल्या नवऱ्यावर काढते. यातच खरी गोम आहे. आता खेड्यामध्ये जाताना पराभूत होऊन जावं तर तसं नाही – बाई आपण खड्ग घेऊन चाललो आहोत असे सांगते आणि आपण एका प्रचंड नाट्यसंघर्षाच्या अपेक्षेने आतूर होतो. एकूणच बाईचं खुडकणं, तो जळफळाट यामागे आहे तरी काय, हे कोडे प्रेक्षकांच्या दृष्टीने सुटायचेच असते.

गावात आल्यावर पुन्हा तोच जळफळाट. त्यात तिचा संन्यासी नवरा यायचा असतो. तो येतो तो आपल्या म्हाताऱ्या वहिनीला भेटायला. बायको–पोरे यांच्या तो पलीकडे गेलेला असतो. मात्र या अनाथ बाईला स-नाथ होण्याची ही संधी असते. कदाचित आपला नवरा मिळाल्यावर आपण जरा मजबूत पायावर उभे राहून भांडूतंडू शकू असे तिला वाटत असावे; पण नवरा तिच्या हाती लागत नाही. आपल्या संन्यासी नवऱ्याला शरीराची जाणीव आहे, ही गोष्ट तिने हेरलेली असते. ती त्याचा तिरस्कार करत असते आणि तिचे शरीर त्याने अतृप्त ठेवलेले असते याचाच तिला जळफळाट झालेला असतो, हे या प्रसंगी लक्षात येते. जळफळाट करणाऱ्या असामीचे कुणाशीच टयुनिंग जमत नाही, त्याप्रमाणे तिचे आपल्या मुलाशी जमत नाही. तो आपल्या काकांच्या इच्छेप्रमाणे लग्न करायला तयार होतो, तर दुसरा मुलगा मुंबईला जाऊन चांगला शिकत असतो. ती बिचारी एकाकी रहाते. एका ब्लँक वॉलसमोर आल्यागत तिची परिस्थिती होते आणि मग ती अपेक्षेप्रमाणे आत्महत्या करते.

अशा खुडकणाऱ्या आणि जळफळाट करणाऱ्या स्त्रीची कहाणी ऐकून ‘ च् च् ’ करणारा प्रेक्षकवर्ग आपल्याकडे असल्यामुळे या नाटकाचे यश निश्चित सांगता येईल. गारंबीच्या बापूसारखा कमालीचा मर्दानी देह उभा केल्यानंतर पेंडशांनी केलेली ही निवडणे-टिपणेही मनापासून न करणारी, अ-नाथ बाई पाहून आपल्या प्रेक्षकांना सहानुभूती वाटते, ती दाखवण्यापुरतीच ! आपल्याकडे सहानुभूती या गोष्टीचाच ठेवा मुबलक आहे ना !

आपल्या नाटकात ‘ संवाद-संवाद-संवाद ’ असतात तसेच ‘ रथचक्र ’मध्ये आहेत. नाटक आणि कादंबरी यातील फरक डेव्हलपमेंटचाही आहे. कादंबरी म्हणजे वर्णनात्मक नाटक होत नाही ते याचकरता. कादंबरी


# व्हान गॉग

‘ लस्ट फॉर लाइफ ’ या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे
पर्वती, पुणे

ही एक प्रोसेस असते व तिच्या नाट्यरूपामध्ये त्या प्रोसेसचे दर्शन घडायला हवे. या दृष्टीने पहिल्या अंकात सर्व रंगमंच आडवणारा सेट हा निरुपयोगी. तो एखाद्या बॅकड्रॉपसारखा भासतो आणि त्याच्यापुढील लेव्हलवर घरातली मंडळी शिळोप्याच्या गप्पा माराव्यात त्याप्रमाणे घरची प्रकरणे बोलत असतात. त्यामुळे बालगंधर्वांच्या काळातील नाटकाची आठवण व्हावी. शिवाय संवादाच्या साजेशा मुव्हमेंटसही पात्रांना आवश्यक होत्या. उदाहरणार्थ–ती (लालन सारंग) व तिची जाऊ भांडतात त्या वेळी ती आपला आवाज हिस्टेरिकल टोनपर्यंत चढवते हे ठीक; पण एकाच ठिकाणी उभी राहून ! इथे तिला व जावेला अधिक आक्रमक मुव्हमेंटस् आवश्यक होत्या. एकूणच 'स्टेजी' म्हणता येतील अशा कॅरेक्टर्स पेश केल्यामुळे, त्यातल्या त्यात रिलॅक्स्ड (मोकळा) वाटणारा मोठा मुलगा व शांततामय म्हातारी रोहिणी हट्टंगडी भाव खाऊन गेले तर आश्चर्य नाही. हे नाटक लालन सारंग हिच्यासाठी म्हणून पेश केले आहे हे उघडच आहे. लालनचा एकसुरी संवाद बोलण्याचा ढंग फक्त भांडाभांडीच्या निमित्ताने हिस्टेरिकल पातळीवर नेऊन तिने आपले कॅरेक्टर वाचवले आहे. लालनने बरेचसे जीव तोडून काम केले आहे. मला वाटते या नाटकातला अत्युच्च क्षण म्हणजे संन्यासी आणि तिच्या भेटीचा आहे. आपल्या संन्यासी नवऱ्याला पुन्हा मिळवण्याची तिची खटपट फसते तिथेच हे नाटक व तिची कहाणी संपते. त्यानंतर तिची आत्महत्या एक फॉर्म्यालिटी उरते. त्यानंतर दिग्दर्शकाने 'प्रेमस्वरूप आई–वात्सल्यसिंधु आई' वगैरे गीत वाजवणे म्हणजे काय ? प्रेक्षकांचे डोळे आसवांनी भरावेत म्हणून किती हा पोरका खटाटोप ?

# आरण्यक

## दूचिवाचे आणि छबिलदासमधले

महाभारताचे हिंदू मनाला आकर्षण आहे. पिढ्यान्‌पिढ्या त्यातील आख्याने, नीती, तत्त्वज्ञान आम्ही ऐकत, पाहत आलो आहोत. तरीही त्यांची गोडी अजून अवीट आहे. त्यातील आख्यानांवर आजच्या काळातही कथा-कादंबऱ्या रचल्या जातात आणि त्या मोठ्या संख्येने खपतात, नाटके रचली जातात. ती पाहायला लोक गर्दी करतात. महाभारताचा शोध अजून थांबला नाही. महाभारताचे वेड अजून संपलेले नाही. 'आरण्यक' हेही महाभारतातील एका लहानशा तुकड्यावर रचलेले नाटक आहे.

भारतीय युद्ध संपले. युद्धानंतरची ती आत्यंतिक भीषण शांतताही संपली. पांडव राज्य करू लागले; परंतु एक उदास, भकास, विषण्ण छाया सारे वातावरण व्यापून टाकते. येथे 'आरण्यक' नाटक सुरू होते. विदुर, धृतराष्ट्र, गांधारी, कुंती यांच्या मृत्यूशी नाटकाचा शेवट होतो. युयुत्सूचा मृत्यू होतो. राजवाडा भयाण वाटतो. म्हणून ही चार वृद्ध माणसे अरण्यात जातात. तेथे विदुराच्या मृत्यूने धृतराष्ट्राला निराधार वाटू लागते. तो वणव्यात शिरतो. गांधारी आणि कुंतीही त्याच्या मागोमाग जातात. प्रतिहारीला इच्छा असूनही तो त्या वणव्यात शिरू शकत नाही. एवढेसेच हे कथानक.

महाभारताच्या आधाराने ज्या कथा, कादंबऱ्या, नाटके लिहिली गेली ती प्रामुख्याने 'ययाती'सारखे अद्भुत रोमांचकारी आख्यान निवडून किंवा त्यातील भीषण युद्धाभोवती तर कधी कर्णासारखी बाजूची व्यक्ती मध्यबिंदू कल्पून; परंतु महाभारताच्या शेवटच्या भागाला केंद्रबिंदू बनविणारे, मला वाटते, 'आरण्यक' हे पहिलेच मराठी नाटक आहे. रत्नाकर मतकरी यांच्या नाटकाचा विषय म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. 'आरण्यक'चे आणखी एक वैशिष्ट्य आहे. जुन्या पंतकवींपासून आजच्या ललित लेखकांपर्यंत सर्वांनी महाभारताचा अनेक प्रकारे उपयोग करून घेतला. अनेक हेतूंनी महाभारताच्या कथा राबविल्या आहेत. पंतकवी, कीर्तनकारांनी आपापल्या काळातले नीतिउपदेश–कथनासाठी महाभारतातील आख्याने रंगविली. शाहीरांनी याच कारणासाठी त्यांचा उपयोग केला. स्वातंत्र्यपूर्व काळात देशजागृतीसाठी 'कीचकवध'सारखे नाटक लिहिले गेले, तर वैज्ञानिक युगातील आधुनिक मानवाचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न खांडेकरांनी महाभारतकथेतून केला. श्री. मतकरी यांनी आपल्या नाटकावर असे कोणतेही ओझे लादलेले नाही. म्हणूनच 'आरण्यक' त्याच्या मूलस्वरूपात उभे आहे. कीर्तनकाराच्या आख्यानांचा ढोबळपणा (पांडव सत्पक्ष, कौरव असत्पक्ष) 'आरण्यक'ला नाही. धृतराष्ट्र, गांधारी, कुंती, विदुर, युयुत्सु, युधिष्ठिर, प्रतिहारी या सगळ्यांची व्यक्तिमत्त्वे, स्वभाववैशिष्ट्ये 'आरण्यक'मध्ये जाणवतात. अनेक दुःखे सोसून कुंती शांत आहे. युधिष्ठिर स्थितप्रज्ञ, दक्ष राजा आहे. तसाच तो आज्ञाधारक, कर्तव्यतत्पर पुत्र आहे. धृतराष्ट्र दुःखी, गोंधळलेला, काहीसा अगतिक, कोणाच्या तरी आधाराने जगणारा आहे. गांधारी मनात पुत्रशोकाने सतत जळते आहे. धीरगंभीर विदुर त्या सगळ्यांना आधार देत स्वतःच्या जीवनाचा विचार करतो आहे. विदुर आणि कुंती यांचे अतीव विश्वासाचे मधुर नाते आहे. यातल्या कोणत्याच व्यक्तीचा आपल्याला तिरस्कार वाटत नाही. कोणाहीबद्दल प्रेम किंवा आदर उसळून येत नाही. मनात फक्त विचार येत राहतो अटळ नियतीचा. आपण पाहत राहतो–एकाच रक्ताची, एकमेकांचे शत्रुत्व करणारी तरीही

एकमेकांच्या आधारानेच जगणारी ती माणसे. या अटळ दैवाचा प्रत्यय 'आरण्यक'मधून एकसारखा येत राहतो.

मात्र 'आरण्यक' पाहताना हे सारे जाणवते, असेच म्हणावे लागते. विषयाची समग्र प्रभावी प्रतीती देण्यास नाटकाचा प्रयोग तितका समर्थ वाटला नाही. लेखकाने जे लिहिले आहे, ते कलाकारांकडून उचित भानाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचले नाही. एक धृतराष्ट्र (विनायक पै) आणि काही प्रमाणात विदुर (दिलीप प्रभावळकर) व युधिष्टिर (प्रदीप भिडे) वगळल्यास वाकीच्यांचे रंगमंचावर वावरणे, अभिनय व भूमिकेचे भान नसलेले होते. शब्द उच्चारण्याची पद्धत अगदी आधुनिक नाटकासारखी होती. ती महाभारताच्या गांभीर्याला साजेशी नव्हती. नाटकाची लेखनशैली जशी संस्कृतप्रचुर होती तसाच शब्द उच्चारण्याच्या पद्धतीला म्हणजे वाणीलाही संस्कृतचा नाद, संस्कृतची लय असणे आवश्यक होते; परंतु याचा अभावच आढळला. युयुत्सूचे (हेमंत चिटणीस) हलणे, बोलणे यातून एक तडफडणारा आत्मा दिसण्याऐवजी थयथयाट करणारा संतप्त युवक दिसत होता. गांधारी (प्रतिभा मतकरी) कुंती (वसुधा गंधे) यांची वेषभूषा आधुनिक स्त्रियांसारखी होती. त्यांच्या कपडयांचे रंगही अतिशय भडक होते. ते नाटकाच्या गंभीर प्रकृतीशी सर्वथा विसंगत वाटत होते. त्यांची केशरचनाही 'मॉडर्न' म्हणावी अशीच होती. त्या महाभारतकालीन स्त्रिया वाटूच शकत नव्हत्या. युधिष्ठिराची वस्त्रं नेसण्याची पद्धतही विचित्रच वाटली. प्राचीन कथा साकार करताना वेषभूषेचे भान एकंदरीत कठीणच असते. अजिंठा वेरूळच्या चित्रांवरून कल्पना घेऊन वेषभूषा ठरवायला हवी. या दृष्टीने 'संकल्प'च्या 'माधवी एक देणे' या एकांकिकेतील वेषभूषा उत्कृष्ट वाटली होती. निवडलेल्या पात्रांची शरीरयष्टी, चेहरेपट्टी आपापल्या भूमिकेला योग्य होती. तरीही अशा अनेक कारणांमुळे एखाद्या 'व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार' ही प्रक्रिया घडली नाही.

काही वर्षांपूर्वी दूरचित्रवाणीवर 'आरण्यक'चा प्रयोग पाहिला होता. तो अतिशय प्रभावी, खिळवून ठेवणारा वाटला होता. दूरचित्रवाणीवरील रंगमंचावर राजप्रासादाची भव्यता, रितेपण, उदासीनता सारे सहज जाणवत होते. त्या दृश्याला एक खोली होती. छबिलदासच्या रंगमंचावरील दृश्याला ही खोली नव्हती. दूरचित्रवाणीचे केवळ कृष्णधवल रंगाचे माध्यम या शांत गंभीर नाटकाला अधिक योग्य वाटत होते. आवाज घुमणे, प्रतिध्वनी, मनातले भास यांचीही प्रतीती दूरचित्रवाणीवर अतिशय सूक्ष्मपणे प्रभावीपणे येत होती. छायाचित्रण, ध्वनिमुद्रण या तांत्रिक गोष्टींमुळे ते घडले असू शकेल. 'आरण्यक' विचारपरिलुप्त आहे. अशा विचारप्रधान कलाकृतीला रंगमंदिरापेक्षा दूचिवाचे जवळीक साधणारे (Fritiwente) माध्यमच अधिक योग्य वाटते.

काहीही असो. दूचिवावर विलक्षण चित्तवेधक वाटलेले 'आरण्यक' दि. १८ मार्चच्या छबिलदासमधील प्रयोगात तितके प्रभावी वाटले नाही एवढे मात्र खरे. अनेक वर्षांनंतर केलेला पहिला प्रयोग हे त्याचे कारण असू शकेल. नाटक पाहताना मन लेखनात गुंतत होते आणि दृष्टीला अनेक गोष्टी खटकत होत्या.

नाटकात अगदी क्वचित 'वर्दी', विदुर-'जी' असे उर्दूनिष्ठ शब्द आले. ते वगळून संस्कृतनिष्ठ शब्द घेतले असते तर बरे झाले असते. "कसली भीती ? लाव नीट संगती ! ही तर युद्धनीती !" अशी एकंदर संगीतमिश्र शैली होती. मूळ महाकाव्य पद्यात्मक असल्यामुळे त्याच्याशी साधर्म्य ठेवण्यासाठी ही शैली योग्य वाटत होती. नाटकाची नांदी, मध्यन्तर या कल्पना विदग्ध संस्कृत नाटकासारख्या वाटल्या. विशेषत: विजया मेहता यांच्या 'मुद्राराक्षस'च्या सादरपद्धतीशी त्याचे साम्य होते.

**—प्रतिनिधी**


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

## मुंबई वार्ता

पृष्ठ ४ वरून

आहेत. एकेका स्टॉलचे नीट निरीक्षण करण्यासाठीच प्रदर्शन बघणाऱ्यांना वेळ अपुरा पडतो.

या सर्व स्टॉल्समध्ये आकर्षक आहे तो 'वाइल्ड लाइफ वॉंडर्सचा' स्टॉल ! हा स्टॉल निसर्गजीवनातील अनेक आकर्षक पोस्टर्स व फोटोग्राफनी सजलेला आहे. स्टॉल उभारण्यात प्रमुख काम असलेले श्री. नंदकुमार मोघे हे प्रत्येकाला तत्परतेने माहिती देताना दिसतात. तसेच सायंकाळी उत्सुक प्रेक्षकांसाठी वन्य जीवनातील स्लाइडस्‌ही दाखविण्यात येतात.

याच प्रदर्शनातील साबणाचा स्टॉलही आकर्षक आहे. एक क्षुल्लक गोष्ट म्हणजे साबण. ही भावना असणाऱ्यांचा येथे निश्चितच अपेक्षाभंग होतो. या स्टॉलवर वेगवेगळ्या प्रकारचे साबण बनवून विकले जातात. केवळ साबणाच्या या विविध प्रकारांनीच एखादा 'स्वच्छ' व्हावा. या स्टॉलवर काम करणारी माणसेही विविध खेड्यांतून आलेली दिसतात व ग्रामीण अगत्याने ती सर्वांनाच उत्साहाने व तत्परतेने माहिती सांगत असतात.

'अंध' हा विषय गेल्या काही दिवसांतील घटनांनी गाजत आहे. त्याच पार्श्वभूमीवर अंधांची कार्यक्षमता दाखविणारा स्टॉल डोळसांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. अगदी खडू बनविण्यापासून ते हातमाग चालविण्यापर्यंत अनेक कामे अंध स्वहस्ते करताना दिसतात. या कामात हँगर्स बनविणे या गोष्टीचाही समावेश झालेला पहावयास मिळतो.

वरवर दृश्य उभे न करता प्रत्येक गोष्टीत खोलात जाऊन जिज्ञासूंना माहिती पुरवण्याचा केलेला प्रयत्न, त्याचप्रमाणे ग्रामीण भागाचे यथास्थित दर्शन व ग्रामीण अगत्य, यांचा हे प्रदर्शन म्हणजे संगमच म्हणावा लागेल.

### महापौर – निवडणूक

मुंबई महापालिकेची महापौर निवडणूक आता जवळ येत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने विविध पक्षोपक्षांच्या हालचाली चालू झालेल्या दिसतात. महापालिकेत 'पुलोद'चे बहुमत असल्याने त्यांनी आपली एकजूट टिकवून जर महापौरपदासाठी उमेदवार उभा केला तर त्यांचा विजय निश्चित आहे. पण...हीच गोष्ट अवघड आहे. गतवर्षी 'पुलोद' आघाडीतील समांतर काँग्रेस गटाला यंदा महापौरपद द्यायचे असे निश्चित झाले होते; परंतु त्यानंतर राजकीय घटना बऱ्याच घडून गेल्या आहेत. समांतर काँग्रेस संपून, अर्स काँग्रेस झाली आहे व या काँग्रेसच्या यशवंतराव चव्हाणांपासून शरद पवारांपर्यंत सर्वांची अलीकडच्या काळातील वक्तव्ये बघितली की 'जनता' पक्षाशी समझोता करण्याच्या ते मन:स्थितीत दिसत नाहीत.

अशा स्थितीत महापौरपदाच्या निवडणुकीत अर्स काँग्रेसच्या उमेदवारास महापौरपद द्यायला पालिका जनता गटातील अनेक नगरसेवकांचा विरोध दिसतो व तो साहजिकच आहे. या गटाचे म्हणणे असे की महापौरपदी जनता पक्षाने स्वत:चा उमेदवार उभा करावा. असे झाल्यास व बाळासाहेब ठाकरे यांना वाटते त्याप्रमाणे निवडणुकीच्या वेळेस सर्व अर्स काँग्रेस नगरसेवक काँग्रेस (इं) गटात सामील झाल्यास ही निवडणूक चुरशीची होईल.

महापौरपद अर्स काँग्रेसला देऊ नये असे म्हणणाऱ्या जनता नगरसेवकांच्यात प्रमुख गट आहे तो पूर्वाश्रमीच्या जनसंघ नगरसेवकांचा. तर मृणाल गोरेंचे काम केले म्हणून ज्या जनता नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली त्या ५ जणांना व इतर १ अशा ६ समाजवादी नगरसेवकांना जनता पक्षाने कबूल केल्याप्रमाणे अर्स काँग्रेसला पाठिंबा द्यावा असे वाटते. पाठिंबा न दिल्यास जनता विरोधी नगरसेवकांची संख्या ६५ च्या वर जाते व जनता बाजूची संख्या ७३ वर जात नाही. याचाच अर्थ निवडणूक चुरशीची होणार ! जनतातर्फे डॉ. मेमन यांना तिकीट मिळेल असे दिसते. □

हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....


नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी



महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच !
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पांच रुपयांपासून
बचत करु शकता.

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग !**

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : पुणे

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा

# चित्रपट

सदानंद बोरसे

## आखरी इन्साफ

खरं म्हणजे ' त्या 'चं आणि माझं अगदी भांडण नाही; पण फारसं बरं नाही. तरीही त्याच्याकडून एक पाकीट आलं. त्यात माझ्यासाठी एक तिकीट होतं– ' आखरी इन्साफ 'चं. मला आधी वाटलं, तारीख उलटून गेली असावी; पण तसंही नव्हतं. म्हटलं चला, आपल्याला नाही तरी बघायचा होताच. गेलो.

पडद्यावर एक विजयेंद्र आला. त्याचं नाव म्हणे वीरेंद्र सक्सेना. तो मोठा उद्योगपती, म्हणजे तो कधी पंचवीस लाखाच्या खाली आकडा उच्चारतच नाही. तर त्याला एक स्वतःचं उद्योगसाम्राज्य बनवायचंय; पण मध्येच त्याचं एका वेश्येच्या मुलीशी– किरणमालाशी (झरीना वहाब) प्रेम-बीम जुळतं. म्हणजे काय होतं की, ती त्याच्याकडं नोकरी मागायला येते, तो तिला आपल्याबरोबर एक रात्र घालवशील का विचारतो, ती तयार होते आणि मग सूर्य उगवतो तो दोघांच्या प्रेमात न्हायलेली सोनेरी किरणं जगावर उधळतच. पुढं वीरेंद्रचे पिताजी आपल्या पोराच्या निरनिराळ्या उद्योगांमुळं हाय खाऊन मरतात; पण मरताना ते आपली सर्व संपत्ती दान करून टाकतात. आता त्या उद्योगसाम्राज्याचं काय ? म्हणून मग वीरेंद्र एका आणखी मोठ्या उद्योगपतीच्या मुलीशी–मोनिकाशी लग्न करतो. हा आणखी मोठा उद्योगपती; त्यामुळे तो एक कोटीच्या खाली बोलत नाही. वीरेंद्र आपल्या श्रीमंत सासऱ्याकडून–वाजपेयीकडून एक कोटीचं कर्ज घेतो, त्यातून स्वतःचं कर्ज फेडतो. त्यात काही तरी लफडं होतं. एवढ्या मोठ्या रकमा ऐकून मी स्वतः आधीच चक्रावलो होतो; त्यामुळं मला कळलं ते एवढंच–आपण आत्महत्या केल्याची बतावणी करून वीरेंद्रला बरेच पैसे मिळवायचे असतात; पण वाजपेयी वीरेंद्रचा खून करून पैसे हडप करतो. त्याचा आळ किरणमालावर येतो; पण शेवटी ती भर कोर्टात वाजपेयीवर गोळ्या झाडून त्याला मारते आणि हा ' आखरी इन्साफ ' योग्य असल्याचं सिद्ध करण्यासाठी तिचा वकील-अशोककुमार पुन्हा एकदा तिच्या बाजूनं लढायला तयार होतो.

चित्रपट संपला होता.

संपूर्ण चित्रपट दिग्दर्शक कालिदास यांनी कोर्टात चाललेल्या साक्षी, त्यातून उघडकीस येणाऱ्या वेगवेगळ्या घटनांचे फ्लॅश बॅक आणि त्यांची एकमेकांशी घातलेली सांगड अशा पद्धतीने सादर केला आहे. त्यानुसार पटकथेची रचना बऱ्यापैकी चांगली होऊनही (पटकथा व संवाद-कमलेश्वर) मुळात अत्यंत कच्च्या राहिलेल्या कथावस्तूमुळे चित्रपट फारच ठिसूळ व अजीबात पकड न घेणारा बनला आहे. रहस्य, त्याची जाळीदार गुंफण आणि नीटस उकल यासाठी आवश्यक असलेले कल्पनेचे नाविन्य हिंदी चित्रपटांमध्ये अभावानेच आढळते. बहुतेक ठिकाणी उचलेगिरी एकमेकात भेसळलेली; पण या मिलावटीतही कौशल्याचे दारिद्र्यच असते. ' आखरी इन्साफ 'मध्येही प्रेताच्या मदतीने एखाद्याच्या मरणाचा आभास उत्पन्न करणे (संदर्भ–अगर, चक्रव्यूह), शेवटी कोर्टातच खुन्याला मारणे व वकिलाने पुन्हा नवीन लढ्याची तयारी करणे (संदर्भ–Witness for the Prosecution) इत्यादी प्रकार उचललेले आहेतच; पण ते जोडता काही धड आले नाहीत, त्यामुळे संपूर्ण चित्रपट मोठा विनोदी चित्रपट बनला आहे. शिवाय अन्य चित्रपटांमध्ये हमखास असणारी नाचगाण्यांची ठिगळंही ' आखरी इन्साफ 'मध्ये भरपूर प्रमाणात आहेत.

विजयेंद्र, झरीना वहाब, प्रदीपकुमार इत्यादींबद्दल काय लिहिणार ? रणजीतसुद्धा फार बरा वाटू लागला.

चित्रपटामध्ये सुरू झालेली डोकेदुखी बऱ्याच वेळाने थांबली, तेव्हा ' त्या 'नं मला तिकीट का पाठवलं, ते माझ्या ध्यानात आलं. मग मीही शांतपणं ' खंजर 'चं एक तिकीट आणलं, गुलाबी पाकिटात घातलं आणि पाकीट ' त्या 'ला नेऊन दिलं. ☐